रविवार, १२ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ९६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 12 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-96 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5


# कांडलीतील दारूबंदीसाठी गूरूजी सरसावले !

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** ग्रामगीतेच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कांडली (ता. भोकर ) एक आदर्श गाव म्हणून ओळख आहे. त्याच गावात अवैध दारू विक्री होत असल्याने तरूण पिढीचे आयूष्य बरबाद होत आहे. यावर त्वरित आळा बसवावा अन्यथा बालदिनाच्या निमित्ताने बुधवारी (ता. १४)अमर उपोषण करण्याचा ईशारा ग्रामगीता प्रचारक कीर्तनकार तथा सहशिक्षक गीरोड गंगाधर गुरूजी यांनी दिला आहे. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौजे कांडली हे गाव प्रारंभी पासून ग्रामगीतेचे प्रेमी असल्याने त्यांच्यावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा पगडा आहे. सन १९६५ साली स्वताह तुकडोजी महाराजांनी गावास भेट देऊन प्रबोधन केल ते एव्हड्यावरच न थांबता ग्रामस्थाची भक्ती पाहून दोन वेळेस भेटी दिल्या. त्याच्या विचाराने प्रभावित होऊन चक्क गावचा कायापालट झाला.आज हि नित्यनेमाने प्रार्थना घेतली जाते.अनेक मान्यवरांनी भेटी देऊन ग्रामस्थाच कौतुक केले आहे. अशा सुसंस्कृत गावात काही लोकानी पैशाच्या लालसा पोटी अवैध दारू विक्रीचा सपाटा लावला आहे. दारूमुळे अनेकाचे संसार उद्धवस्त झाले तर काही जणांना जीव गमवावा लागला आहे. गावात सुरू असलेल्या गैरकारभाराची चीड निर्माण झाल्याने येथील रहिवासी ग्रामगीता प्रचारक तथा किर्तणकार, सहशिक्षक गीरोड गंगाधर गूरूजी यांनी गावात होणारी अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी अन्यथा बालक दिनानिमित्ताचे औचित्य साधून गावातील मारोती मंदिरावर बूधवार पासून बेमुदत उपोषण करण्याचा ईशारा निवेदनात श्री. गीरोड यांनी दिला आहे. यावर संबंधित वरिष्ठ काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# दीपावली : आनंद आणि प्रकाशपर्व




आधुनिक केसरी

गृहिणींच्या दृष्टीने तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते ! दिवाळी आली की तिच्या आनंदाला सीमा नसते. कारण विविध कारणांनी बाहेरगावी असलेली तिची मुले यानिमित्ताने तिच्याकडे येणार असतात. भाऊबीजेला भाऊ येणार असतो किंवा तीच सर्वांना भेटायला माहेरी जाणार असते. आयुष्यभरासाठी ज्या पतीची जोडीदार म्हणून तिला साथ लाभलेली असते, त्याच्यावरचे प्रेम व्यक्त करणारा आणि एकूणच पतिपत्नीच्या नात्याला बळ आणि आनंद देणारा पाडवा या चार दिवसांमध्ये असतो. त्यामुळे दिवाळी येण्यापूर्वीच तिची लगबग सुरु होते. यानिमित्ताने घराची साफसफाई केली जाते. फराळाचे गोडधोड पदार्थ केले जातात. आजच्या धावपळीच्या जीवनात शहरातील गृहिणीला, नोकरी करणाऱ्या स्त्रीला या सगळ्यांसाठी कदाचित फारसा वेळ मिळत नसेल पण उत्साह मात्र तोच असतो. भावनाही त्याच असतात.

दिवाळीला आपापली घरे आपण स्वच्छ तर करतोच पण जेवढे शक्य असेल तर तेवढी सजावटही करतो. घराला बहुधा नवीन रंग दिलेला असतो, नवीन फर्निचर घराची शोभा वाढवते. बाहेर देखणा आकाशकंदील लागलेला असतो. मनोहारी रोषणाई आणि पणत्यांची आरास केलेली असते. एकंदरीतच सगळा आसमंत उजळून निघतो. म्हणूनच दीपावली हे आनंद आणि प्रकाशपर्व आहे.

आली आली रे दिवाळी आनंदाचा हा सण दारावर तोरण मांगल्याचे दीप तऱ्हेतऱ्हेचे लावियले दारी सुखावती सारी लोचनांना दीपावलीला पहाटे होई अभ्यंगस्नान प्रसन्न तनमन होत असे. असा हा सुंदर सण. या सणाचे महत्व जर आपण आजच्या पिढीला समजावून सांगितले नाही तर हा फक्त एक मोठा सण आहे, चार दिवस सुटी असते, नवीन काहीतरी खरेदी करायची, गोडधोड करून खायचे, फटाके उडवायचे यासारख्या गोष्टी करणे म्हणजेच दिवाळी असा त्यांचा समज होण्याची शक्यता आहे.



# आनंदी पहाट

## मनाच्या श्रीमंतीचे मूल्यमापन होऊ शकत नाही

आधुनिक केसरी

शरीरा इतकेच आपल्या मनाचं स्वास्थ्य देखील महत्वाचं असतं. दिसणाऱ्या शरीराची जितकी काळजी घेतली जात असते, तितकी न दिसणाऱ्या मनाची आपण खरंच घेत नाहीत. आपल्याच मनाचा, मनाप्रमाणे, मनापासून, मनमुराद, मनसोक्त, मनातल्या मनांत तरी विचार करत नाहीत. आणि करत असलो तर तो किती, कसा आणि कधी करत असतो, हे पाहणे महत्वाचे असते. आजच्या जीवनात आपल्या बदलेल्या जीवनमानामुळे अनेक आजार उद्भवतात. मनावर अनेक प्रकारचे ताण येत असतात. कालांतरानं रोग हे शरीरावर दिसायला लागतात. परंतू त्याचं मूळ स्थान आणि उगम आपलं मनच असतं. त्या दृष्टीने आपल्या मनावरच आपलं लक्ष केंद्रित व्हायला हवं. मन हेच रोगाचं मूळ कारण असतं. मन शांत करणे आणि त्यासाठी ध्यान करणे, हाच त्यावरील रामबाण उपाय असतो. दैनंदिन कामाच्या राम रगाड्यापासून, कौटुंबिक जबाबदाऱ्यामधून काही ठराविक वेळ ध्यानासाठी राखून ठेवावा. सकाळी ध्यान करणे उत्तम, ज्यामुळे आपण संपूर्ण दिवसभर मानसिक पातळीवर शांत, आनंदी राहण्यास आपल्याला मदत होते. आपल्या रोजच्या दगदगीतून विश्रांती हवी असेल तर सायंकाळी चहापानाच्या वेळी देखील आपण ध्यान करू शकतो. ध्यानाच्या कालावधीची, ही एकच वेळ आपल्या स्वतःसाठी राखून ठेवलेली वेळ असली पाहिजे. पंचेंद्रियांची सगळी कवाडे बंद करून, मनाची चंचलता थांबवून स्वतः सोबत राहून गाढ विश्रांती मिळवणे त्यावेळी निश्चितच शक्य होत असतं. आपली श्रीमंती पैशांत नाही तर मनःशांतीमध्ये असते हे सर्वप्रथम प्रत्येकानं समजून घ्यायला हवं. पैसे मिळवण्याच्या स्पर्धेत आपण काहीअंशी यशस्वी होतो परंतू मानसिक अस्वस्थता पत्करून ते यश प्राप्त केलं जातं. मनःशांती हीच खरी श्रीमंती असते, हे लक्षात घेतलं पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# हवयं का???

आधुनिक केसरी

जगण्यासाठी काय, किती आणि कसं हवं याची काही ठोस अशी व्याख्या नाही. जो तो आपल्या पद्धतीने जीवन जगत असतो. नेटकं असावं पण फाटकं असू नये एवढीच अपेक्षा. कुटुंबाचा उदरनिर्वाह नीट होत आहे ना?? सर्वांच्या आवश्यक त्या गरजा पूर्ण होत आहे ना!!! मग कशाला हवी जास्तीची माया ??? कष्टाचं जेवढं मिळतं त्यात समाधानी राहू या. गरजेपेक्षा जास्त अनावश्यक खरंच हवयं का?? काही गरज नाही. थोडक्यात माणूस समाधानी राहतो. सुखाची झोप लागते. पैसा कमवण्यासाठी जिवाचं रान करावा लागतं. कुटुंबापासून दूर राहावं लागतं. ज्यांच्यासाठी हे कमवतो त्यांच्यापासून दूर राहायचं. मग काय अर्थ आहे त्या मायेला ???? कुटुंबात जिव्हाळा असावा. गाडी बंगला जमीन-जुमला सहज मिळाला तर घ्या. वणवण करू नका .कोणाला लुबाडू नका. फसवू नका. ओरबाडू नका. मन समाधानी नाही राहणार. रात्री सुखाची झोप नाही लागणार. त्यासाठी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहा. भरलेल्या माठातून पिण्यासाठी आपण फक्त एक ग्लास पाणी घेतो. तसेच संपत्तीच्या बाबतीत करावं. गरजेपुरतं कमवावं. जास्त नको. त्याची चोरी होते. ज्याचं असतं तो नेतो. मग ते कोणत्याही रूपात जातं. आयुष्यातील चार आश्रमाचा प्रवास नीट व्यवस्थित करावा. फार सुखी होतो माणूस. माझं माझं करूच नका. माझं माझं केलं आणि ते नाही मिळालं तर दुःख होतं. कशाच्याही मोहात अडकू नका. संसार हा अशाश्वत आहे तर भक्ती शाश्वत आहे. योग्य वेळी योग्य तेच करा. घडणाऱ्या घटना घडत राहतील त्याकडे आपला बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. आपल्या आनंदी मनाला एकदा विचारा,"खरंच आणखी काही हवंय का?

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.24

# हिऱ्याचा आकार कसा

आधुनिक केसरी

एकदा एक इसम बादशहाच्या दरबारात तक्रार घेऊन आला. बादशहाला आपली तक्रार सांगताना तो म्हणाला, "महाराज, काल एका व्यापाऱ्याला मी माझ्या घरी जेवायला बोलावले होते. जेवायला थोडा वेळ होता म्हणून माझ्याकडे असलेला हिरा मी त्याला दाखविला. नंतर जेवण तयार झाल्यामुळे जेवणाच्या गडबडीत मी हिरा परत ठेवायचे विसरलो. आता माझ्या घरात हिरा नाही. तो हिरा या व्यापाऱ्याला आवडला होता आणि तोच हिरा घेऊन गेला आहे. तेव्हा त्याला माझा हिरा परत करायला सांगा. 'बादशहाने नेहमीप्रमाणे हे प्रकरण बिरबलाकडे सोपवले. त्या इसमाच्या तक्रारीनंतर बिरबलाने त्या व्यापाऱ्याला बोलावून आणले. बिरबलाने त्या व्यापाऱ्याकडे चौकशी केली तेव्हा तो म्हणाला, 'सरकार, काल मी या इसमाकडे जेवायला गेलो होतो हे खरे आहे पण मी काही त्याच्याकडे हिरा पाहिला नाही. त्यामुळे तो घेण्याचा आणि परत देण्याचा प्रश्नच येत नाही. आता बिरबल पेचात पडला. त्याने अधिक चौकशी केली तेव्हा त्याला असे कळले की व्यापाऱ्यासोबत जेवायला त्या इसमाने आणखी चार लोकांना बोलावले होते. बिरबलाने त्या चौघांना दरबारात बोलावले. त्यांच्याकडे चौकशी केली तेव्हा त्या इसमाने आधी सांगून ठेवल्याप्रमाणे ते म्हणाले, 'होय सरकार आमच्यासमोर या व्यापाऱ्याने तो हिरा पाहिला आणि नंतर परत दिला नाही. 'याचा अर्थ व्यापाऱ्याने हिरा पाहिला तेव्हा तुम्ही तो पाहिला? बिरबलाने त्या चौघांना विचारले ते हो म्हणाले तेव्हा बिरबल त्यांना म्हणाला याचा अर्थ हिरा कसा होता ते तुम्हाला माहित आहे. मी तुम्हाला चिकन माती देतो त्या माती पासून तुम्ही मला त्या हिऱ्यासारखा हिरा तयार करून दाखवा. बिरबलाने त्या चौघांना चिकन मातीचा गोळा दिला. त्या चौघांना वेगवेगळ्या कक्षात बंद करून टाकले आणि हिऱ्याचा आकार तयार करायला सांगितले. थोड्यावेळाने बिरबलाने त्या चौघांची भेट घेतली तेव्हा चौघांनी चार प्रकारचे हिरे तयार केले होते. एकाने हिऱ्याचा आकार वस्त्रासारखा केला होता. दुसऱ्याने त्याला सुईचा आकार दिला होता. तिसऱ्याने हिरा घणासारखा केला होता. तर चौथ्याने त्याला रंध्याचा आकार दिला होता. यावरून बिरबलाला या चौघांचे व्यवसाय काय आहेत ते कळले. तसेच यांनी कुणीही जन्मात हिरा पहिला नाही. त्यामुळे तो इसम ठग असून व्यापाऱ्याला फसविण्यासाठी त्याने हिरे चोरल्याचा आरोप केला आहे हे बिरबलाने ओळखले. बिरबलाने जरासा हिसका दाखवतात तो इसम आपण ठग असल्याचे कबूल झाला. व्यापाऱ्याला ठगवण्यासाठी आपण हा बनाव केल्याचे त्याने सांगितले.

# निरुपण


आधुनिक केसरी

तंव ते मातेस मरण आलें ।प्राणी पोरटें जालें ।
दुःखें झुर्णी लागलें ।आई आई म्हणोनी ॥१६॥
आई पाहातां दिसेना ।दीनरूप पाहे जना ।
आस लागलिसे मना ।आई येईल म्हणोनी ॥१७॥
माता म्हणौन मुख पाहे ।तंव ते आपुली माता नव्हे ।
मग हिंवासलें राहे ।दैन्यवाणें ॥१८॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

जीव ताप में जल रहे, उर धधकत बहु आग ।
दर्शन शीतल सन्त के, बुझी जलन्ती आग
।।२१।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/२१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जीव अनेक कष्ट, दुःख आणि शोकात जळत आहे आणि ह्दयात अनेक आशा-वासनांचा अग्नी धगधगत आहे, परंतू संत-दर्शनाने ही जळणारी आग विझून जाते आणि शितलता व शांती प्राप्त होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी

साक्षीरूपाने आपण निराळे आहोत असा प्रत्यक्ष अनुभव येतो. सर्व पदार्थांना तो जाणतो तो त्या पदार्थाच्या पलीकडे असतो. त्याच्याहून निराळा असतो. असा अनुभव आल्यावर देहांत असून देखील अगदी सहज अलिप्तता साधता येते.आणि ज्याला हा अनुभव येतो तो म्हणतो की,आपण साक्षीभावाने वागावे.आजूबाजूला दिसत असले तरी द्रष्टेपणाने त्यापासून वेगळे होऊन रहावे. मी फक्त निमित्तमात्र आहे यावर विश्वास ठेऊन वागावे.

ब्रम्हवस्तूमध्ये कोणताच भेद नाही.तो संपूर्ण अभेद आहे. या अभेदरूप वस्तूंमध्ये द्रष्टा कसा आणता येईल. त्यासाठी एक ऊदा पाहूया एका ठिकाणी साखरेचा ढीग करून ठेवला आहे आणि जर तुम्हाला सांगितले की ह्या साखरेतील कडूपणा निवडून बाजूला काढा ? तर हे जसे शक्य नाही तसे सगळे परब्रह्म सच्चिदानंद स्वरूप भरलेले असताना तेथे द्रष्टा स्वरूप वेगळेपणाने बाहेर काढता येणार नाही. त्यात परब्रम्हाची सहजता असते.
श्री राम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# गुरु सांगेल तेच साधन

आधुनिक केसरी


परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदुःख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही



आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा. खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वतःकरता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी.

# समर्थ रामदास

आधुनिक केसरी



पुढे तेथून पायी चालत चालत पंचवटीस येऊन रामदासांनी रामाचे दर्शन घेतले, आणि टाकळीस दीर्घ तपश्चर्या केली. वयाच्या १२ व्या वर्षी नाशिकला आलेले समर्थ १२ वर्षे तपश्चर्या करीत होते. समर्थांनी स्वयंप्रेरणेने स्वतःचा विकास विद्यार्थी दशेत असतानाच करवून घेतला असे मानले जाते. नाशिकमध्ये आपल्याला कोणी ओळखू नये म्हणून त्यांनी (समर्थ) रामदास हे नाव धारण केले. टाकळी येथे ते इ.स. १६२१ ते १६३३ असे १२ वर्षे राहिले. आपल्या या साधनेसाठी त्यांनी टाकळीची निवड करण्यामागे येथील नंदिनी नदीच्या काठावरील उंच टेकाडावरील घळ किंवा गुहा येथे असलेला एकांत हेच कारण असावे. या तपःसाधनेच्या कालावधीमध्ये ते पहाटे ब्राह्ममुहूर्तावर उठून रोज १२०० सूर्यनमस्कार घालत असत. सूर्योदयापासून माध्यान्हापर्यंत नदीच्या डोहात



आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १२ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com | Adhunik Kesari




# भिकाऱ्याच्या निधनानंतर सापडले घबाड!

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** अपघातात निधन पावलेल्या भिकाऱ्याच्या गोधडीमध्ये लाखोची रक्कम, विविध बँकांचे पासबुक, एटीम कार्ड मिळाले. पोलिसांनी प्रामाणिकपणे ती रक्कम मृत भिकाऱ्याच्या परिवाराला सोपविली. दीपक बाबुराव मोरे (वय ४८) असे मृताचे नाव आहे.

८ नोव्हेंबर रोजी एक व्यक्ती सायकलवर जात होती. दुचाकीने धडक दिल्याने ती गंभीर जखमी झाली. त्यांना रुग्णालयात भरती करण्यात आले. त्यांची थैली रस्त्यावर तशीच पडून होती. त्या थैलीत लाखो रुपये होते. पोलिसांनी ते ताब्यात घेऊन रुग्णाला पुढील उपचारासाठी अकोल्याला पाठविले. सोबतच्या वस्तूंमध्ये गोधडीत आणखी मोठी रक्कम, बँकांची पासबुके, एटीएम कार्ड आणि चिल्लर भरलेली थैली होती. त्यात १ लाख ६३ हजार रोख मिळाले. एका बँकेत २६ हजार, दुसऱ्या बँकेत एक लाख नऊ हजार २८४ रुपये, इतर बँक खात्यात मोठ्या रकमा होत्या. पोलिसांनी मृताची पत्नी चंदा मोरे, मुलगा धम्मपाल यांच्याकडे रक्कम सोपवली.

# बिहारप्रमाणे राज्यातही जातीनिहाय जनगणना करा

## राज राजापूरकर : तर हिवाळी अधिवेशनात सरकारवर हल्लाबोल करणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील ओबीसीचीं बिहार राज्याच्या पार्श्वभूमीवर जातीनिहाय जनगणना व्हावी, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रथमपासून आग्रही आहे. त्यामुळे येत्या १५ दिवसांत ही जनगणना झाली नाही तर राष्ट्रवादी ओबीसी सेल येत्या हिवाळी अधिवेशनात सरकारवर हल्लाबोल करणार असल्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिला आहे. राज राजापूरकर म्हणाले की, ओबीसीचीं जातीनिहाय जनगणना व्हावी म्हणून अनेक राजकीय पक्ष भाष्य करत आहेत. मात्र, ही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाविकास आघाडीत असताना आणि विरोधी पक्ष असतानासुद्धा केली होती. ओबीसींची जातीनिहाय जनगणना बिहारमध्ये करण्यात आली. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातही जनगणना व्हावी, अशी आमची इच्छा आहे. बिहारमध्ये नितिश कुमार आणि तेजस्वी यादव यांच्या सरकारने ती केली. जनगणनेनुसार आरक्षणही त्याठिकाणी देण्यात आले. मग महाराष्ट्रात जनगणना का होत नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राज राजापूरकर पुढे म्हणाले की, येत्या पंधरा दिवसांत जर राज्य सरकारने याबाबत पावले उचलली नाहीत तर आम्ही राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेवून त्यांना निवेदन सादर करणार आहोत. त्यातूनही काही साध्य झाले नाही तर रस्त्यावर उतरुन आंदोलने, निदर्शने, उपोषण या माध्यमातून येत्या हिवाळी अधिवेशनात मोठ्या संख्येने उपस्थित राहू असे राज राजापूरकर यांनी यावेळी स्पष्टपणे सांगितले आहे. नामदेव जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार साहेब यांच्यावर केलेल्या आरोपांबाबत बोलताना राज राजापूरकर म्हणाले की, जाधव यांचे वक्तव्य केवळ खोडसाळपणाचे आहे.







# भागवत धर्म आणि संस्कृती समन्वय



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**संस्कृतींचे एकरेषीकरण होण्याच्या या काळात इतरांचे सहअस्तित्व मान्य करून आपल्यात कालानुरूप बदल करत सामान्य माणसाच्या व्यवहार्य पातळीवर सांस्कृतिक मूल्यभान रुजवता येते हे कदाचित आपणांस पटणार नाही; परंतु भागवत धर्माने त्याचा एक वस्तुपाठ समाजात विशेषतः मराठी मुलुखात घालून दिला. त्याची योग्यायोग्यता, मूल्यात्मकता आणि ऐहिक जीवनावरील त्याचे परिणाम या अनुषंगाने आजवर अनेकांनी प्रकाश टाकला. त्याविषयी अधिक खोलात जाण्यापूर्वी भागवत धर्म म्हणजे काय? याची थोडक्यात माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करू. भागवत म्हणजे भगवतभक्तांच्या कथा. या कथा पहिल्यांदा परीक्षित राजाला शुकमुनींनी सांगितल्या.**



## क्षितिजापल्याड

त्यात कोणत्या भक्तांच्या कथा होत्या, किती काळ सांगितल्या, त्या कथा श्रवणाने काय साध्य झाले इत्यादी तपशिलात न जाता त्याचे प्रयोजन तेवढे माहीत झाल्यास बऱ्याच गोष्टींचा उलगडा होईल. भक्ती रसाची निर्मिती करून व्यक्तिगत सुख किंवा मुक्ती साधने हा मुख्य उद्देश यामागे होता. आज त्याला फार तर सामाजिक सलोख्यासाठी भक्तीभावपूर्ण कथा असे म्हणू. द्वापारयुगामध्ये श्रीकृष्णाने आपल्या लीलांच्या माध्यमातून जी मोहिनी निर्माण केली होती त्याचा कलियुगातील स्थितप्रज्ञ अवतार म्हणजे पंढरपूरचा पांडुरंग होय असे म्हटले जाते. हा पांडुरंग मोठा विलक्षण आहे. तो जसा कृष्णावतार आहे तसाच तो बुद्धावतार म्हणूनही मान्यता पावलेला आहे. भागवत धर्म म्हणजे वेगळ्या अर्थाने बुद्ध धर्मच असल्याची मांडणी काही अभ्यासक करतात. रावसाहेब कसबे यांनी तर, बौद्ध धर्म गेला तरी जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य न मानणारा आणि समानता मानणारा बौद्ध विचार हिंदू धर्मात आला. भागवत धर्म हा बौद्ध धर्माचा हिंदू विकास आहे असे म्हटले आहे. हे थोडे टोकाचे विधान झाले. हे खरे आहे की बौद्ध धर्माचा प्रभाव येथील साहित्य, संस्कृती आणि एकूणच विचार पद्धतीवर झाला. कारण आपल्यातील कर्मकांडाला दूर सारून आणि प्राणिहत्येचा निषेध करत विकसित झालेला भागवत धर्म हा सनातन कट्टरता आणि असहिष्णुता दूर करून सर्वांना सामावून घेणारा विचार म्हणून पुढे आला. रा. चिं. ढेरे यांनी तर पांडुरंगाला समन्वयकच म्हटले आहे. कारण हा पांडुरंग वैदिक आणि बौद्ध संस्कृतीला जोडणारा जसा आहे तसाच अनेक भाषकांना आपल्याकडे आकर्षित करणारा देखील आहे. तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे, कानडीने केला मऱ्हाटा भ्रतार या म्हणण्यामागे सांस्कृतिक समन्वयाचा विचार आहे, भलेही कोणाचे उत्तर कोणालाही नाही आले तरी. भागवत धर्माचा मराठी आविष्कार असा होण्यामागे जसे काही प्रमाणात बौद्ध तत्त्वज्ञान आहे तसेच महाराष्ट्रातील तत्कालीन परिस्थिती देखील आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात नाथ संप्रदायाचे प्रस्थ निर्माण झाले होते. त्यातून गूढ तंत्रविद्येचा भयगंड समाजमनावर पडलेला होता. आत्ममुक्तीसाठी केवळ तंत्रसिद्धी करणे कोणत्याही काळात सामान्य माणसासाठी शक्य नसते तशीच ती तेव्हाही शक्य नव्हती. एकीकडे तंत्रमार्ग आणि दुसरीकडे चक्रधरस्वामी प्रणित महानुभाव संप्रदाय सामान्य माणसाला समानतेच्या पातळीवर आणू पाहत होता. बाजूलाच महात्मा बसवेश्वर यांनी स्वर्ग नरक या बाह्य वस्तू नसून त्या आपल्यातच वास करत असतात अशी मांडणी करून आत्मलिंगाची प्रतिष्ठापना केली. अशा सांस्कृतिक वातावरणात महाराष्ट्रीयन जनता भांबावून जाणे साहजिक होते. या पार्श्वभूमीवर संत नामदेवांनी सर्वांना सोपे जाईल अशा नामभक्तीचे रहस्य आपल्या अभंगातून विशद करण्यास सुरुवात केली. त्याला संत ज्ञानेश्वर यांनी शास्त्रीय आधार मिळवून दिला. आचार्यांना वाट पुसत आपण निघालो आहोत असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ते याच कारणासाठी. कारण शंकराचार्यांनी या ठिकाणी बौद्धमताला आव्हान देऊन शास्त्रार्थाच्या माध्यमातून बौद्धमत दूर सारण्याचे आणि वैदिक विचार पुढे आणण्याचे कार्य आचार्यांनी केले होते. स्वतः संत ज्ञानेश्वरांवर केवळ वैदिक संस्काराचाच पगडा होता असे नव्हे तर त्यांना बौद्धमतातले बारकावे देखील ज्ञात असल्याचे अभ्यासकांनी आता सिद्ध केले आहे. ज्ञानेश्वरांच्या पूर्वी आणि नंतर सुद्धा दोन संस्कृतींना जोडणारा अजोड ग्रंथ लिहिला गेला नाही. प्रतिमा, प्रतीके आणि दैवत कथांच्या माध्यमातून सामान्य माणसास भक्तीप्रवन करण्यासोबतच औपनिषेदिक तत्त्वज्ञान शेवटच्या



माणसापर्यंत पोहचवण्याचे कार्य संत ज्ञानेश्वर करतात. कारण त्यांना भक्ती आणि विचार इथे रुजवायचा होता. त्यांच्या नंतर अगदी आजपर्यंत देखील ज्ञानेश्वरांच्या विचाराला छेद देणे तर सोडाच पण त्यापेक्षा पुढचा विचार देखील इथे निर्माण झाला नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मनावरील हा प्रभाव कोणाच्या विरोधी नसून सर्वांना आपल्यात सामावून घेणारा, बहुसांस्कृतिकता जोपासणारा आणि भक्तीच्या क्षेत्रातील समानता प्रदान करणारा ठरला. नंतरच्या सर्व संतांनी कमी अधिक प्रमाणात हाच विचार आपल्या अभंगातून पुढे नेला. हे सांस्कृतिक समन्वयन चांगले की वाईट अशा बेताने आपण त्याचे विश्लेषण करू नये तर ऐहिक आणि पारमार्थिक दृष्टीने केले पाहिजे. या प्रकारच्या संस्कृतीचा पारमार्थिक जो काही लाभ मिळायचा तो महाराष्ट्राला मिळाला असेल नसेल, पण इथल्या ऐहिकतेचे काय? या अनुषंगाने भागवत धर्माकडे पाहिले पाहिजे. कारण आज आपण केवळ एक समूह नाहीत तर आपण एका नागरिक समाजाची निर्मिती केली आहे. या नागरिक समाजाच्या हितासाठीची पोषक तत्त्वे सांस्कृतिक जग प्रदान करते का? आपल्यात सामावून घेताना आणि सर्वांभूती ईश्वरत्व प्रदान करताना समन्यायी वातावरण निर्माण करण्यासाठीची सांस्कृतिक मूल्ये कोणती? हाही शोध महत्त्वाचा ठरणार आहे. कारण आपल्या अंतरंगीचे सारे भावविश्व संस्कृतीने व्यापून टाकले असेल आणि आपला व्यवहार मात्र वेगळाच निर्देश करत असेल तर आपली कुठेतरी गल्लत होते आहे हे समजले पाहिजे. केवळ भागवत धर्माचीच नव्हे तर ज्याही धर्माने संस्कृती रक्षणाची ग्वाही दिली त्या झाडून साऱ्या धर्मांची सांस्कृतिकदृष्ट्या चिकित्सा झाली पाहिजे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# एक दिवा जागृतीचा



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतात दरवर्षी वेगवेगळे सन उत्सव साजरे करून आपली संस्कृती व संस्कार जपत असतात. सन साजरे करण्यामागे काहीतरी उद्देश हा नक्कीच असतो. वाडवडिलांपासून चालत आलेल्या संस्कृती चे पालन सन उत्सव या माध्यमातून होत असते. सन उत्सव साजरे करण्याचे दुसरेही महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या धर्म संस्कृतीचे जतन करणे होय. अनेक सनांच्या माध्यमातून अनेक चांगले सामाजिक संदेश दिले जातात. जसे रक्षा बंधनला भावाने बहीनीचे रक्षण करावे. अर्थात काही अंगाने हा सन महिलांना दुय्यम व कमकुवत समजून पुरूषांना प्राधान्य देणारा असला तरीही आपण सखोल वादात न पडता ढोबळ मानाने विचार केला तर बहिनीचे रक्षण भावाने केले पाहिजे, अथवा बहीनीचा मान सन्मान भावाने केला पाहिजे असे आपण समजू.**

होळीच्या सनाच्या माध्यमातून समाजातील चुकिच्या वाईट प्रवृत्ती जाळून सकारात्मक विचाराची पेरणी करण्यासाठी होळी सन साजरा केला जातो. रंगपंचमी च्या माध्यमातून रंगाची उधळन करून सर्व माणसे सारखेच आहेत. रंग कोणाचीही एका जाती धर्माची खाजगी संपत्ती नाही अशा आशयाचा संदेश दिला जातो. दसऱ्याच्या माध्यमातून विजयाचा दिवस साजरा करून दसऱ्याला ही रावणाचे दहण करून वाईट प्रवृतींना जाळून चांगल्या संस्कृती चा स्विकार केला असा संदेश दिला जातो. आता रावणाला आदिवासी समुदाय आपला राजा माणुन पुजा करतात, पुरोगामी विचारसरणी चे लोक प्रत्येक सन हा काऊंटर करून साजरा केला जातो असे मत मांडतात. म्हणून मी अगोदर च सांगितले फक्त यातून आपल्याला संदर्भ घेऊन वरच्या वर अभ्यास करायचा आहे. सण साजरे करणाऱ्यांना विरोध नाही कारण तो त्यांचा संविधानीक अधिकार आहे. आणि पुरोगामी विचार मांडून हन उत्सव नाकारणाऱ्यांना ही विरोध नाही कारण त्यांचा अभ्यास व ऐतिहासिक पुरावे आहेत. आणि मत मांडण्याचा त्यांना ही अधिकार आहे. परंतु एवढे मोठ्या प्रमाणात दरवर्षी आनंदाने सन साजरे केले जातात. एवढे मोठ मोठे संदेश दिले जातात तर काय खरंच देशात बहीनी सुरक्षित आहेत? खरचं देशात रंगावरून माणसाची ओळख ठरत नाही? देशात खरचं माणसा माणसात गोडव्याचे वातावरण आहे? काय खरचं देशातील वाईट प्रवृत्ती नष्ट झाल्या? काय खरचं देशातील जनता सुखी आहे? काय खरचं लोखांचा विजय झाला? या प्रश्नांची समिक्षा करून कधीतरी आम्ही आमच्या वर्तनामध्ये सुधारणा करणार आहोत का? घरात धर्माची संस्कृती जपताना सण उत्सवाच्या माध्यमातून दिलेले संस्कार बाहेर जपतो का? या प्रश्नांची उत्तरे मिळवणे आवश्यक आहे. धर्म म्हणजे केवळ भक्ती नसावी आणि धर्माच्या नावाखाली चुकिच्या गोष्टी लपण्याचा प्रयत्न ही करू नये कारण चुकीच्या गोष्टी लपवू लपवु चुकांचा खजीना तयार होतो. आणि आज केलेल्या चुका सुधारल्या नाही तर उद्या तेच संस्कार होतात. दुसरी महत्त्वाची आणि सत्य गोष्ट म्हणजे धर्माचे अंधभक्तीने केलेले पालन होय. सत्य हे कटु असते आणि ते पचायला अवघड जाते. तरी ही सत्य बोलणे आवश्यक असते. कारण कटु औषधानेच अनेक आजार बरे होतात. धर्माच्या नावाखाली केवळ जुन्या आणि चुकिच्या गोष्टींचा स्विकार केल्या पेक्षा काही गोष्टी बदलने आवश्यक असते. स्वतःला वेळेनुसार नुसार बदलले नाही तर वेळ आपली दखल घेत नाही. जसे बाजारात एक मोबाईल कंपनी खुप जोरात व्यवसाय करत होती. अर्थातच त्याची गुणवत्ता ही चांगली होती परंतु वेळ बदलली आणि मोबाईल मध्ये सुधारणा होऊन अँड्रॉइड व्हर्जन आले आणि बाजारात सर्वात जास्त नाव असलेल्या कंपनीने नवीन बदल स्विकारला नाही. आज गुणवत्ता असुनही ते वेळेनुसार बाजूला फेकले गेले. कोणी दखल घेत नाही. म्हणून प्रत्येक बाबीमध्ये चांगला बदल अपेक्षीत असतो. देशात महिलांना सन्मान देऊन महिलांच्या रक्षणासाठी अनेक सण साजरे केले जातात परंतु शासकीय आकडेवारी नुसार मागील पाच वर्षात जवळपास तेरा लाखाऊन महिला बेपत्ता आहेत. बहीने संरक्षण करण्याचे संस्कार असून तसे सनही साजरे केले जातात आणि त्याच देशात २०२१ साली बलात्काराच्या साठ लाख गुन्हांच्या नोंदी होतात. बंधुभाव व एकात्मतेचे सन उत्सव साजरे करणाऱ्या देशात वर्षाला हजारो जातीय दंगली होतात, बैलपोळा नावाचा सन शेतकरी साजरा करून बैलाबद्दल प्रेम व्यक्त करून बैलांचे एकप्रकारे आभार मानण्याचा सन असताना आज शेतकऱ्यांना कडे बैल नाही आणि शेतकरी फासावर लटकतो हे वास्तविक परिस्थिती कशी लपवणार? सणांचा सन दिवाळी म्हणून दिवाळीला सनांचा राजा म्हणतात. या दिवशी मोठ्या आनंदाने हा उत्सव साजरा करण्यात येतो. घराबाहेर दिवे लावण्यात येतात. खरं तर दिवा अंधार दुर करून प्रकाश देत असतो. प्रत्येक धर्मामध्ये दिवा, प्रकाश याला खुप महत्त्व आहे. दिवा अर्थात प्रकाश अज्ञानाकडून विज्ञानाकडे नेत असतो. पण आपण खरचं विज्ञानवादी झालो का हा प्रश्न स्वतः च्या मनाला विचारने आवश्यक आहे. कारण धर्माच्या, श्रद्धेच्या नावाखाली लाखो रुपये देऊन कथा वाचन करतो, मंदिरात दान करतो तोच पैसा आपल्याच जाती धर्मातील गरीब मुलींच्या लग्नाला, गरीब मुलांच्या शिक्षणाला, गोरगरीब लोकांच्या दवाखान्या साठी खर्च करून चांगले कर्म केले तर धर्माचे पालन होणार नाही का? पण आपण तसे का करत नाही? आजही सुशिक्षित व पैशावाले लोक अंधविश्वासाच्या एवढ्या आहरी गेलेले आहेत कि अंगठेबहाद्दर भोंदु लोक अंधविश्वासाच्या नावाखाली सुशिक्षित महिलांचे लैंगिक शोषण करून आर्थिक पिळवणूक करतो. या विरोधात आवाज उठवणे सत्कर्म नाही का? गुप्त धन काढून देतो म्हणून पाच बहीणीवर बलात्कार, नवऱ्याला नोकरी लागण्याचे योग येतील म्हणून महिला कॉस्टेबल वर बलात्कार, कथा वाचणासाठी आल्यावर महिलेवर बलात्कार, पैशाचा पाऊस पाडतो म्हणून चार महीलेवर बलात्कार, घरात पूजेसाठी आलेल्या भोंदुबुवा ने आई व तिन मुलीवर केला बलात्कार अशा बातम्या ऐकुन चुकीच्या कृत्याला आळा घालण्यासाठी आणि भोंदूगिरी व अंधविश्वास नष्ट करून महिलांचे जिवन व पुरुषांचे जिवन उज्वल करणे याला धर्माचे काम म्हणायचे नाही का? स्वतः ला सुशिक्षित व श्रीमंत समजणारे लोक लाखों रूपये भोंदुबुवा ला देऊन सुख मिळण्याची अपेक्षा करतात अशी विचार सरणी कधी बदलणार? खरंच जे सण उत्सव साजरे करतो त्यामधून आपण काही शिकतो का की केवळ करायचे म्हणून करतो? शोषण पिळवणूक हि अडाणी अज्ञानी व्यक्तीची झाली तर आपण समज शकतो परंतु इंजिनिअर असलेल्या तरुणाने घरात सुख यायला पाहिजे लाखों रुपये खर्च करायचे याला नेमकं काय म्हणायचं? केवळ काल्पनिक धनाच्या पायी पाच पाच बहीनीवर  सतत अनेक दिवस बलात्कार यामध्ये नेमका दोष कोणाला द्यायचा? म्हणून जर दिवाळी सण साजरा करताना अनेक दिवे आपण लावतोच परंतु त्यामध्ये एक दिवा खरचं जागृती चा लावला आणि समाजात, धर्मात स्वतः बरोबर इतरांची जागृती होऊन मानसिक अज्ञानाकडून वैचारिक विचाराकडे, पाखंड, भोंदूगिरी कडून विज्ञानाकडे, जाती धर्माकडून मानवतेकडे जाण्यासाठी एक दिवा लावला आणि त्याची जाणीव ठेवली तर हळूहळू का होईना जागृती होण्यास मदत होईल. जागृती होण्यासाठी जात धर्म बाजूला सारून समोर माणूस म्हणून बघावे लागते. तरच आपण वैचारिक बनू शकतो. धर्माच्या व जातीच्या नावाखाली अनेक भोंदु जोपासले जात आहेत, काही काही लोक लोकांकडून पैसे घेऊन प्रबोधनाच्या नावाखाली लोकांचीच डोके भडकवून देतात. तरुणांना चुकीची माहिती देऊन दिशाभूल करतात. सत्य असत्य यामधला फरक करून मानवाची सेवा करण्याचा भाव असला पाहिजे. मानवा बद्दल तिरस्कार व घ्रणा नसायला पाहिजे. लाखों रुपये देऊन कथा वाचने होम करणे यापेक्षा वाचनालय उघडून पुस्तके दिले तर एका बरोबर अनेक लोक वाचायला लागतील. अंधविश्वासाच्या नावाखाली आपला पैसा दुसऱ्याला दिल्या पेक्षा जागृत होऊन तोच पैसा आपल्या आपल्या धर्मातील लोकांच्या आरोग्य, शिक्षण व रोजगारासाठी खर्च केला तर गावागावात माणुसकी व एकतेचे भव्य मंदीर उभे राहील. आपल्या बहिनी सोबतच इतरांच्या बहीनीचे संरक्षण केले तर बलात्काराचा आकडा साठ लाखावरून शुन्य व्हायला वेळ लागणार नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १२ नोव्हेंबर २०२३

adhunikkesari.com | Adhunik Kesari

# दिल्ली सरकारची कानउघाडणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** स्वतः काही न करता न्यायालयावर बोझा टाकण्याचा प्रयत्न करू नका, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिल्ली सरकारची कानउघाडणी केली. राष्ट्रीय राजधानीत वाहनांसाठी सम-विषम योजना लागू करण्याचा निर्णय शहराच्या सरकारने घ्यायचा असून न्यायालय त्याबाबत काही निर्देश जारी करणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.
सम- विषम योजनेशी न्यायालयाचे काहीही देणेघेणे नाही आणि ही योजना आजूबाजूच्या राज्यांतून दिल्लीत येणाऱ्या टॅक्सींनाही लागू करावी असे आपण कधीही म्हटलेले नाही, असे न्या. संजय किशन कौल यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दिल्ली- राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील हवेच्या ढासळत्या दर्जाबाबतच्या याचिकेवर सुनावणी करताना सांगितले. हवेचे प्रदूषण ज्यावेळी संभवतः शिखरावर जाईल तेव्हा, म्हणजे दिवाळीनंतर १३ ते २० नोव्हेंबर या काळात आम्ही सम-विषम योजना लागू करू असे दिल्ली सरकारने पूर्वी जाहीर केले होते, मात्र सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी या प्रकरणाची सुनावणी केल्यानंतरच ती लागू केली जाईल, असे दिल्लीच्या पर्यावरणमंत्र्यांनी नंतर म्हटले होते.
दरम्यान, अधूनमधून पडलेल्या पावसामुळे शुक्रवारी दिल्लीतील हवेच्या गुणवत्तेत वेगाने सुधारणा झाली, तसेच गेल्या दहा दिवसांहून अधिक काळ वातावरणात पसरलेले धुके मोकळे झाले. दुपारी एक वाजता दिल्लीतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) ३१४ इतका, म्हणजे 'अतिशय वाईट' श्रेणीतील होता. सकाळी ९ वाजता तो ३७६,तर शुक्रवारी सकाळी सात वाजता ४०८ इतका होता. गुरुवारी सकाळी ११ वाजता एक्यूआय ४६० इतका होता. हवेचा वेग प्रदूषके वाहून जाण्यासाठी अनुकूल असल्यामुळे हवेचा दर्जा आणखी सुधारण्याची अपेक्षा आहे.
कुठल्याही वेळचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) हा गेल्या २४ तासांतील नोंदींची सरासरी असते. दिल्लीतील बहुतांश भागांमध्ये पावसाच्या हलक्या सरींची नोंद झाल्याचे हवामान खात्याच्या आकडेवारीवरून दिसले. पंजाब, हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेशासह वायव्य भारतातील बहुतांश भागांमध्ये गुरुवार रात्रीपासून पाऊस झाला, असे हवामान खात्याचे वरिष्ठ शास्त्रज्ञ कुलदीप श्रीवास्तव यांनी सांगितले. हवामानाच्या अनुकूल स्थितीमुळे दिवाळीपूर्वी हवेच्या गुणवत्तेत किरकोळ सुधारणा होईल अशी अपेक्षा हवामान खात्याने यापूर्वी व्यक्त केली होती.
दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील प्रदूषणाचा स्तर हा गेल्या काही दिवसांपासून चिंतेचा विषय झाला आहे. पावसामुळे दिल्लीकरांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी दिवाळीनंतर प्रदूषण वाढण्याची भीती आहे. पावसामुळे दिल्लीतील हवेच्या दर्जात लक्षणीय सुधारणा झाल्यामुळे, वाहनांसाठी सम-विषम योजनेची अंमलबजावणी दिल्ली सरकारने लांबणीवर टाकली असल्याचे राज्याचे पर्यावरणमंत्री गोपाल राय यांनी शुक्रवारी सांगितले. दिल्लीलगतच्या पंजाब व इतर काही राज्यांतील पिकांचे खुंट जाळणे थांबवले जायला हवे आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील  प्रदूषणाचा स्तर घटवण्यासाठी तोडगा काढायला हवा, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.











महाराष्ट्र Business Katta









# संघर्षाचा दूसरा टप्पा : युद्ध निर्णायक वळणावर



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**इस्त्रायल हमास युद्ध आता निर्णायक टप्प्यावर आले आहे. इस्त्रायलने गाझापट्टीला वेढा दिला आहे. जमिनीवरून आणि हवाई मार्गावरून दूहेरी मारा चालू आहे. दहा तासांच्या घनघोर लढाईनंतर गाझापट्टीवर ताबा मिळविल्याचा दावा इस्रायलने केला आहे. परंतु हमास ते मान्य करायला तयार नाही. पंधरा हजारांपेक्षा जास्त पॅलेस्टीनी निर्वासीत गाझापट्टी सोडून पळ काढत आहेत. अजून युद्धबंदी व शांततेची पुंगी जपानसह अनेक देश वाजवित आहेत. पण इस्रायल त्याला प्रतिसाद देण्यास तयार नाही.प्रथम ओलिसांची सूटका करा अशी ठाम भूमिका इस्त्रायलने घेतली आहे.**

त्यामुळे हमासला शरण येण्याशीवाय दूसरा मार्ग उरला नाही. अत्याचारी, दहशदवादी संघटनेला धडा देण्याचा इस्त्रायलचा प्रयत्न इतिहास नोंदविला जाईल यात शंका नाही. 07 आक्टोबरच्या मध्यरात्री हमासने इस्त्रायलवर रॉकेटचा मारा केला आणि इस्त्रायलच्या भूमित सैन्य घुसविले आणि 199 नागरिकांना पकडून ओलिस ठेवले त्यामध्ये काही विदेशी नागरिकांचाही समावेश होता. आता युद्धाला 30 दिवस पूर्ण होत आहेत तथापि युद्ध विराम होण्याची शक्यता दिसत नाही. इस्त्रायलने युद्ध विराम करावा असा ठराव संयुक्त राष्ट्र संघातही संमत झाला भारताने त्यावेळी तटस्थ भूमिका घेतली. आता इस्त्रायलवर युद्ध विरामासाठी अनेक पातळीवर दबाव आणला जात आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री ब्लिकिन यांनी अरब देशांचा दौरा करून त्यांची मते आजमावून घेण्याचा प्रयत्न सूरू केला आहे. अमेरिकेने मानवतावादी दृष्टीने पॅलेस्टाईनला मदत करावी असा अरब देशांचा आगृह आहे. याउलट जोपर्यंत ओलिसांची सुटका होत नाही तोपर्यंत युद्ध बंदीमुळीच नाही.अयशी ठाम भूमिका इस्त्रायलने घेतली आहे. दोन्ही बाजूनी हल्ले व प्रतिहल्ले वाढत आहेत. आणि संघर्षाचे क्षेत्र व्यापक होत आहे.

**गाझापट्टीला वेडा :** इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू एका बाजूला शांतता बोलणीस नकार दिला आहे आणि दूसऱ्या बाजूला इस्त्रायलच्या संरक्षण दलाने गाझापट्टीवरील कारवाई आक्रमक पणे पुढे चालू ठेवली आहे. ज्या पद्धतीने इस्त्रायलवर आक्रमण करून हमासने अत्याचार केले त्याचा बदला घेण्यासाठी इस्त्रायलने निर्णायक आक्रमक भूमिका घेतली आहे. गाझापट्टीतील 25 कि.मी. च्या भागाला इस्त्रायलने वेढा घातला आहे. इस्त्रायलने आपल्या लष्करी दलाची पद्धतशीर व्युव्ह रचना करून पुढे वाटचाल सुरू केली आहे. जमीनीवरून कारवाई आणि आकाशातून हवाई हल्ले अश्या दूहेरी आक्रमनापूढे हमासचा टिकाव लागणे कठिण झाले आहे. तथापि इजिप्त, इराण व अरब देशांचा सक्रिय पाठिंबा यामुळे हमास इस्त्रायलवर रॉकेट हल्ले चालू ठेवत आहे. शिवाय लेबनॉन सारख्या देशाच्या सिमेवरून सुद्धा इस्त्रायलवर आक्रमण सुरू आहे. इस्त्रायल संपूर्ण गाझापट्टीवर हमासच्या महत्वपूर्ण केंद्रावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. त्याउलट हमासचे दहशदवादी चिवटपणे झुंज देऊन इस्त्रायलचे हल्ले परतविण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा प्रकारे गाझापट्टीत हमास व इस्त्रायलची धुमस चक्री चालू आहे. इस्त्रायलच्या हवाई हल्यात दवाखाने, नागरि सेवा यावर अमानवी हल्ले होत आहेत असा आरोप केला जात आहे पण इस्त्रायल या आरोपाचा इनकार करतांना दिसतो. युद्धातील हल्ले प्रति हल्ले यामुळे झालेल्या जीवित व वित्त हानिचा अंदाज करणे अवघड आहे. **गाझामधील सुरक्षित बंकर :** 2005 मध्ये इस्त्रायलने गाझापट्टीतून माघार घेतल्या नंतर पॅलेस्टिनी लोकांनी गाझापट्टीत सुरक्षित बंकरची उभारणी केली. तेथे वाहतूक, दळण-वळण, निवास स्थाने अन्न सुरक्षा, विज पूरवठा अश्या सर्व सोयी असून कोणत्याही आक्रमणाला तोंड देण्याची तयारी आहे. इस्त्रायलच्या संभाव्य आक्रमणाचा धोका लक्षात घेऊन पॅलेस्टाईनने अत्यंत सुरक्षित अश्या मेट्रो सिटीची व्यवस्था या बंकर्स मधून केली आहे. आकडेवारीत सांगावयाचे झाल्यास 41 कि.मी. लांबीचे हे बंकर असून त्यामध्ये 50 हजारा पेक्षा अधिक लोकांची सोय आहे. त्यामुळे इस्त्रायलनेकितीही हवाई हल्ले केले तरी पॅलेस्टाईन जनता या बंकर्स मधून सुरक्षित राहू शकते. अशी व्यवस्था करण्यात आली आहे. दूसऱ्या महायूद्धाच्या काळात जर्मनी कडून होणाऱ्या हल्ल्यापासून वाचवण्याठी दोस्त राष्ट्रांनी जसे बंकर उभारले होते त्यापेक्षा ही अधिक सुरक्षित भूमिगत भूयारांचा विकास करण्यात आला आहे. ती भूयारे इजिप्त, इराण या दोस्त राष्ट्रांना जोडण्यात आली आहेत. त्यामुळे तेथून पॅलेस्टाईन व हमासला वाटेल तेवढी रसद पुरविली जाऊ शकते. त्यामुळे इस्त्रायलला वाटते तेवढी ही



गाझापट्टीतील लढाई सोपी नाही. हमासने युद्धाला तोंड फोडले ते इस्त्रायलधील अंतर्गत दुफळी अशांतता यांचा फायदा घेऊन हमासने बेसावध इस्त्रायलवर अचानक हल्ला करून देशी विदेशी नागरिकांना पकडून नेले ओलिस ठेवले महिलावर अत्याचार केले. इस्त्रायल त्याचा बदला घेण्यासाठी जोराची मुसंडी मारत आहे. इस्त्रायलच्या पाठिशी अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स ही राष्ट्रे आहेत. परंतू इराण, इराक जॉर्डन, फिलिया लेबनॉन हे देश पॅलेस्टाईनच्या बाजूने आहेत. त्यामुळे ही लढाई ताबडतोब थांबण्याची शक्यता नाही.


**युद्ध बंदी का नको ?** इस्त्रायलला युद्ध बंदी नको आहे कारण युद्ध बंदी केल्यास हमासला तयारी करण्यास वेळ मिळेल याची इस्त्रायलला भिती वाटते. तसेच आय.एस.आय.एस. म्हणजे 'आंतर राष्ट्रीय इस्लामिक स्टेट' या दहशतवादी संघटनेचा हमासला असलेला पाठिंबा अधिक व्यापक होईल. तेव्हा हमास बरोबर आपाट निकराची लढाई करून अक्रमकाला तत्काळ मागे रेटले पाहिजे अशी इस्त्रायलची भूमिका आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहूहे आपल्या विरोधकांना बरोबर घेऊन तेथील जनतेचा पाठिंबा घेऊन हमास बरोबर अतिम लढाईसाठी सज्ज झाले आहेत. हमासचा पराभव आता नाही तर कधीच नाही या भावनेतून इस्त्रायल लढत आहे. इस्त्रायल प्रयत्न सर्वंकष युद्ध करून शत्रूला खडे चारणे हा आहे. ते जेव्हा शरण येतील, ओलिसांची सुटका करतील नाहीतर अचानक दबावाल बळी पडून युद्ध बंदी केल्यास शत्रूला डावपेच खेळण्यासाठी अधिक वेळ मिळेल आणि इस्त्रायलला पुन्हा नव्या युद्धामध्ये अधिक शक्ती खर्च करावी लागले अशी भिती वाटते त्यामुळे इस्त्रायल आता जिंकू किंवा मरू अश्या अति-तटीच्या लडाईस सज्ज झाला असून त्याच्या सर्व क्षमता नूसार लढाईस तयार झाला आहे. इस्त्रायलच्या संरक्षण दलाची ताकद मोठी आहे. तसेच त्यांचे हवाई दल ही सज्ज्ा आहे त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांची मोसाद ही गुप्तहेर संघटना जगात सर्वात श्रेष्ठ व पहिल्या क्रमांकाची आहे. ती सर्व बाजूनी गोपनिय माहिती जमा करून पंतप्रधानांना पूरविते. भू-दल आणि हवाई दलापेक्षाही ही गुप्तचर संघटनेची ताकद मोठी बलशाली आहे. या संघटनेने हमास द्वारा इस्त्रायलचे विमान पाडण्याचा एक डाव मोठ्या चतूराई अलिकडे हानून पाडला आहे. मोसादची अदभूद शक्ती : हमासच्या पाठिशी अनेक राष्ट्रे आहेत त्यामुळे पॅलेस्टाई इस्त्रायलवर चढाई करून आपले आस्तित्व दाखवत आहे इस्त्रायलला पुसून टाकण्याची भाषा केली जात आहे. त्याच्यावर अनूहल्ला करण्याचीही धकमी दिली जात आहे परंतु इस्त्रायलच्या पाठिशी सगळ्यात मोठी शक्ती कोणती असेल तर ती मोसाद या गुप्त चर संघटनेची आहे. या संघटनेचे जाळे जगभर पसरले आहे. शिवाय साम,दाम, दंड, भेद सर्व मार्गांचा वापर करून ही संघटना शत्रू पक्षाचा काटा काढू शकते. इस्त्रायलवर अचानक हल्ला झाला त्याची गोपनिय माहिती या संघटनेने दिली होती. परंतु सरकार गाफिल राहिले यात मोसादचा काय दोष. आता युद्ध काळामध्ये मोसाद आपले कान, नाक, डोळे उघडे ठेऊन सावधपणे हालचालि करत आहे. इस्त्रायलचे माजी  पंतप्रधान आर्यन लेडी गोल्डा मायर आणि माजी संरक्षण मंत्री मोशे दायान यांचा आदर्श समोर ठेऊन सर्व मतभेद विसरून बेंजामिन नेतन्याहू युद्धाला सज्ज झाले आहेत. त्यामुळे लढाई आता ऐरणीवर आली आहे. ही आर पार ची लढाई आहे हे इस्त्रायल पुरते ओळखून आहे त्यामुळे सर्वस्वाचे सर्मपन करण्याची त्याची तयारी आहे.

**समारोप :** या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की प्रथम ओलिसांची सुटका करा मगच शांततेची बोलणी करू आमच्या महिलावर अत्याचार करतांना तुम्ही आचार धर्म कसा विसरला आता एखाद्या रूग्ण वाहिकेवर थोडासा हल्ला झाला तर त्याचे भांडवल करता हा कुठला न्याय असा इस्त्रायलचा हमासला प्रश्न आहे. सर्व अरब राष्ट्रे अमेरिकेला विनवणी करत आहेत मध्यस्थी करा शांतता बोलणी सुरू करा आम्हाला मानवतावादी मदत म्हणून भरपूर मदत करा अशी प्रार्थना करत आहेत. परंतु इस्त्रायल ही चाल ओळखून आहे. मागे दोन-तीन वेळा माघार घेतली परंतू त्यानंतर पॅलेस्टाईन लोकांनी ते करार पायदळी तुडविले आणि पुन्हा इस्त्रायलवर पाशवी अत्याचार करण्यासाठी तेच पुढे सरसावले त्यामुहे इस्त्रायल आता कुठल्याही दबावाला बळी पडून नाग्या टाकण्यास तयार नाही. पहिल्यांदा ओलीसांची सुटका करा मगच युद्ध बंदी करू अशी ठाम भूमिका घेऊन बेंजामिन नेतन्याहू सडेतोड व रोख ठोक जवाब देत आहेत. त्यांच्या या निर्णायक भूमिकेचे कौतूक केले पाहिजे. इस्त्रायलच्या सैन्याचे मनोबल उंचावले आहे ते आता अंतिम विजयासाठी घुसंडी मारत आहेत. त्यामुळे नजीकच्या काही आठवड्यात हमास ओलिसांची मुक्तता करून शांतता बोलणीसाठी तयार होईल असे वाटते. परंतू इस्त्रायलला हमास आणि दहशदवादी संघटनेचे कंबरडे मोडावयाचे आहे त्यामध्ये इस्त्रायलला जेवढे यश येईल तेवढे लकर युद्ध संपेल आणि हमासला शरण येण्याशिवाय दूसरा पर्याय नाही, ही 'काळ्या दगडावरची रेघ' होय.

# वैजापूरच्या गणेश मंडळांना व दुर्गा नवरात्र उत्सव मंडळांना प्रशंसापत्र प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** गणेशोत्सव दरम्यान व नवरात्र उत्सव दरम्यान महाराष्ट्र शासनाने



ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून सामाजिक सलोख्याचा, सामाजिक शांतीचा संदेश दिल्याबद्धल जिल्ह्यातील उत्कृष्ट गणेश मंडळ,नवरात्र दुर्गा मंडळ याना शुक्रवार (ता. १०) रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री संदीपान भुमरे,छत्रपती संभाजीनगरचे आ. प्रदीप जैस्वाल, औरंगाबाद परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण व जिल्हा पोलीस प्रमुख मनीष कलवानिया, अतिरिक्त पोलीस प्रमुख सुनील लांजेवार यांच्या हस्ते प्रशंसा पत्र छत्रपती संभाजीनगर पोलीस मुख्यालय येथे प्रदान करण्यात आले. वैजापूर चा प्रथम क्रमांक सिद्धनाथ गणेश मंडळ,द्वितीय श्री स्वामी समर्थ गणेश मंडळ,तृतीय खंडाळा येथील जय श्रीराम गणेश मंडळ याना मान्यवरांनी प्रशंसापत्र दिले,परीक्षक धोंडिरामसिंह राजपूत,पियुष मालपाणी,खंडाळा निलेश घोडेकर यांनी ही प्रशांसापत्र स्वीकारली तर उत्कृष्ट कार्य करणारे पोलीस पाटील बाबासाहेब बहिरट,बाबासाहेब हरिश्चंद्रे, खंडाळा पोलीस पाटील बागुल यांना ही प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रसंगी वैजापूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे,सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनमोल विनायक केदार  व पो.कॉ. ज्ञानेश्वर मेटे ,वैजापूर यांची ही उपस्थिती होती. याच कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत जमा झालेला मुद्देमाल पांच कोटी नव्वद लक्ष रुपये किमतीचा मूळ मालकांना परत करण्यात आला,ना,भुमरे यांनी पोलिसांठी विश्रांती भवन बांधण्यासाठी डीपीडिसी मधून दोन कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिले,जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस आश्वासन दिले,जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, उत्कृष्ट गणेश मंडळ पदाधिकारी, व पोलीस पाटील उपस्थित होते.



रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १२ नोव्हेंबर २०२३



# नितीशकुमारची अभद्र भाषा !

भारतीय प्राचीन ग्रंथात एक श्लोक आहे,'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता' याचा अर्थ जेथे महिला पुजनीय आहेत,तेथे देवांचे वास्तव असते. तेव्हा भारतीय संस्कृतीत महिलाना ते.महाभारत व रामायणात स्त्रीचा सन्मान व अवमान करणाऱ्या कौरवाचे व रावणाचे प्राण गेले व साम्राज्य बुडाले. इतिहास पहाता भारतात काही महिला राज्यकर्त्या होऊन गेल्या आहेत. यात राणी रुद्रम्मा १५२९-१२८९, राणी दुर्गावती -१५२४ -१५६४ चाँद बीबी -१५५०- १५९९ , देवी अहिल्याबाई होळकर -१७२५- १७९५ कित्तूर राणी चेन्नम्मा-१७७८- १८२९,राणी लक्ष्मीबाई -१८३५- १८५८, राणी अवंतीबाई १८५८ यांचा उल्लेख आहे. भारतात १८५७ ते १९४७ या ब्रिटीश राजवटीच्या विरोधात भारतीय स्वातंत्र्याची चळवळ झाली. यात



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

महिलांचे योगदान आहे.यात कमलाताई चटोपाध्याय,सरोजनी नायडू,भिकाजी कामा,एँनी बेझंट, अरुणा असफ अली यांनी इंग्रजाची झोप उडवली होती.तसेच बेगम हजरत महल, कित्तूर राणी चन्नम्मा, कॅप्टन लक्ष्मीबाई सहगल,कनककता बारूवा, मातांगिनी हाजरा, ताराराणी श्रीवास्तव,मुलमती,तसेच सूचेता कृपालानी,उषा मेहता या रणरागिणींनी स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावले.ब्रिटीश राजवटीत १९२१ मध्ये भारतात प्रथम महिलांना मताधिकार देण्यात आला होता. पण तो मर्यादित होता.नंतर १९०० मध्ये स्त्रियांच्या मताधिक्यांची चळवळ सुरु झाली.स्वातंत्र्यानंतर १९५० मध्ये भारतीय घटनेत कलम ३२४ मध्ये सर्व महिलांना मताधिकार देण्याचा समावेश करण्यात आला. देशात डॉ. आंबेडकर यांचे मुळेच महिलांना सर्व समान अधिकार मिळाले आहेत. त्यांचे उपकार मानले पाहिजेत,त्यामुळे देशाच्या राजकारणात महिलांना संधी मिळत आहे.भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून श्रीमती इंदिरा गांधी तर महिला राष्ट्रपती म्हणून श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना मान मिळाला.आज लोकसभेची एकूण सदस्य संख्या ५४३ पैकी ८२ महिला सदस्य, राज्यसभेची एकूण संख्या २४५ पैकी ३२ महिला सदस्य आहेत. संसदेतील महिलांची संख्या एकूण ११४ आहे. देशातील राज्य विधानसभेत महिलांचे प्रतिनिधीत्व दहा टक्यापेक्षा कमी आहे.बिहार राज्यात विधानसभेची एकूण सदस्य संख्या २४३ पैकी २६ महिला आमदार आहेत.महाराष्ट्रात विधानसभा सदस्य संख्या २८८ पैकी २४ महिला आहेत.देशात मोदी व भाजपाचे सरकार आल्यानंतर प्रत्येक क्षेत्रात महिलांची संधी दिली जात असून त्यांची भागिदारी वाढवली जात आहे. मोदी सरकारने यांनी राजकीय क्षेत्रातही महिला भागिदारी वाढवी म्हणून सप्टेंबर २०२३ मध्ये 'नारीशक्ती वंदन' नावाने महिला ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा मंजूर केला.त्यामुळे २०२९ मध्ये संसदेत १८१ होणार आहे.यात राज्यातील महिला आमदारांची संख्या वाढणार आहे. देशात राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन व मानसिकता अजून तरी बदललेली दिसत नाही.कारण महिलाविषयी विषयी अवमान व टिप्पणी करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.महिला आरक्षणाच्यावेळी राष्ट्रीय जनता दलाचे नेते अब्दुल बारी सिद्दीकी यांनी 'आरक्षणाच्या नावावर पावडर लिपस्टीक लावणाऱ्या बॉब कटवाल्या महिला नोकरीत पुढे जातील' असे विधान केले होते. ज्येष्ठ सदस्य शरद यादव यांनी १९९७ संसदेत महिला आरक्षणाच्यावेळी "छोटे केस ठेवणाऱ्या शहरी महिला ग्रामीण भागाचे प्रतिनिधितत्व कसे करणार ? असे म्हणाले होते.भाजपाचे मंत्री किरण रिजीजू यांनी २०१८ मध्ये काँग्रेसच्या सदस्या श्रीमती रेणुका चौधरी यांच्या हसण्याच्या प्रकारावरुन 'शूर्पनखा' असे म्हंटले होते. तर माकपचे नेता अनिसूर रहेमान यांनी २०१२ मध्ये महिलाविषयी अपशब्द वापरले.मोदी यांनीही २०१२ मध्ये निवडणूक प्रचारात काँग्रेस सदस्य शशी थरूरंना उद्देशून '५० 'कोटीची गर्लफ्रेंड' असा उल्लेख केला होता.पश्चिम बंगालचे सदस्य अभिजीत मुखर्जी यांनी बलात्कार घटनेवरुन 'महिला या नटून -थटून डिस्कोत जातात,नंतर मात्र बलात्काराला विरोध दर्शविण्यासाठी इंडिया गेटला येतात' असे म्हणाले

आधुनिक केसरी

**बिहार राज्याचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी विधानसभेत लोकसंख्या नियंत्रणावर ज्ञान पाजळत असताना अश्लिल भाषण दिले.मुख्यमंत्री- पदावर वीस वर्षे राहिलेला नेता अशी 'सडक छापा'भाषा वापरतो, हे ऐकून सभागृह थक्क झाले!त्यांचे भाषण लज्जास्पद आणि घृणास्पद होते.त्यामुळे सभागृहातील महिला आमदारांना शरमेने मान खाली घालावी लागली.सभ्य माणूस हे शब्द ऐकू शकणार नाही व सहनही करणार नाही.हा महिलांचा अवमान आहे.त्यांच्या या अभद्र भाषेवरुन देशातील महिला व राजकीय पक्ष तीव्र संताप व्यक्त करत आहेत त्यांची जीभ घसरली नाही.त्यांनी जाणीवपूर्वक या शब्दाचा वापर केला आहे. त्यांनी भारतीय संस्कृती व सामाजिक मर्यादेची सीमा ओलांडली आहे.**

होते.२०१९ च्या निवडणुकीत भाजपाच्या उमेदवार आणि अभिनेत्री जयाप्रदा बाबत सपाचे नेते आजखान यांनी अश्लिल टिप्पणी केली होती.नंतर प्रकरणात त्यांना शिक्षा झाली होती.काँग्रेसचे युवराज२०१९ मध्ये 'तामिळनायडू महिलांना सुधारण्यास खूप वाव आहे' असे विधान केले होते.नुकतेच त्यांनी ससंदेत महिला सदस्य असल्याने भान न ठेवता "फ्लॉईंग किस' प्रकार केला.तेंव्हा भाजपाच्या महिला खासदारांनी त्यांनी हा प्रकार घृणास्पद असल्याने गांधी त्यांचेविरोधात कारवाई मागणी केली.महाराष्ट्रात एका शिवसेना नेत्याने व्हिडीओ तयार करून 'जनावराची प्रेमीका' असा शब्द प्रयोग केला होता,काँग्रेसचे नेता अभिरंजन चौधरी व तृणमूल काँग्रेसचे नेता अश्विन गिरी यांनी महिला राष्ट्रपतीबाबत अपशब्द वापरले होते.शिवसेनेचे आमदार गुलाबराव पाटील व मंत्रीअब्दुल सत्तार या नेत्यांनी महिलांविषयी अपशब्द वापरले म्हणून महिलांनी निषेध केला होता.मराठा आंदोलनातही




राज्यातील भाजपा नेते फडणवीस यांचे पत्नीविषयी अभद्र शब्द वापरले गेले तरीही महाराष्ट्रातील सभ्य मराठा नेत्यांनी अथवा राष्ट्रवादी नेत शरद पवार व कन्या व नेत्या सुप्रिया सुळे यांनी निषेध करावा वाटलेला नाही.

ताजे उदाहरण म्हणजे, बिहार मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी तर लाज सोडली,विधानसभेत महिला सदस्य असताना लोकसंख्या नियंत्रणावरुन स्त्री पुरुष लैगिंक सबंधावरुन अश्लिल शब्द वापरले. नितीशकुमार हे अनेक वर्षे मुख्यमंत्री वराजकीय अनुभवी नेता अशी भाषा वापरतो!यातून त्यांची मानसिकता लक्षात येते.

त्यांचा निर्लज्ज बघा! माझ्या एका शब्दाने माझ्याने अवमान झाला असेल तर माफी मागतो,असे म्हणून बचावाचा प्रयत्न केला.यावेळी भाजपा सदस्यांनी घोषणाबाजी व संताप व्यक्त केला.त्यांनी माझ्या विरोधात पक्षाचा आदेश आला असावा,असा राजकीय टोमणा मारला.याचे अभद्र भाषेचे देशात तीव्र पडसाद उमटत असल्याचे दिसू लागल्याने त्यांनी ' मीच माझी निंदा करतो,खेद व्यक्त करतो,माफी मागे घेता,त्यावर प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला. हे नितीशकुमार हे इंडिया चे संयोजक नेते व भावी पंतप्रधानपदाचे दावेदार मानले जातात!हा निर्लज्ज नेता देशाच्या पंतप्रधान होण्याच्या लायक तरी आहे काय? त्यांचेत थोडीफार नैतिकता असेल प्रायश्चित म्हणून मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावयास पाहिजे.'साठी बुध्दी नाठी' अशी म्हण आहे.माणसाचे वय ६० वर्षे झाले की,तो लहान मुलाप्रमाणे वागत असतो.कारण वयस्कर माणसांचा मेंदू असहकार करत असतो!तसे त्यांचे झालेले दिसते आहे.नितीशकुमारांनी अभद्र भाषा वापरुन माता बहाणींचा अवमानच केला आहे.तरी इंडिया आघाडीचे नेते गप्प आहेत! ते यावर प्रतिक्रिया देत नाहीत! काँग्रेस नेत्या प्रियंका वाड्रा यांनीही यावर लगेच व्टिट केलेले नाही.भाजपा राज्यात महिलावर अत्याचाराची झाला की गांधी परिवार धावून जातो,त्यावर राजकारण संसदेत गोंधळ घालत असतो.पण काँग्रेस राज्यात महिला अत्याचाराची घटना घडली ते मौन पाळतात! काँग्रेस पक्ष व गांधी परिवार हा महिला अत्याचार प्रकरणात राजकाणाचा चष्मा वापरत असतो.कोणत्याही पक्षाचे राज्यात घटना सो ती महिलाच आहे. मणिपूर प्रकरणाचे

राजकीय भांडवल केले गेले,सर्व राजकीय पक्षाचे नेते महिलावर अवमानकारक टिप्पणी करत असतात. नंतर माफी मागतात.पण धनुष्यातून निघालेला बाण तोंडातून निघालेला शब्दबाण सारखा असतो!तो मागे घेता येत नाही,तो घायाळच करत असतो ! याबाबत नितीशकुमार यांच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल केली गेली आहे,परंतु ते विधानसभागृहात बोलल्याने त्यांचेवर कारवाई होऊ शकत नाही.

पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीला भोग वस्तु समजली जाते.तिचे चूल आणि मूल हेच काम आहे,अशी जी मानसिकता आहे,ती बदण्याची खरी गरज आहे. भारतात महिला व अल्पवयीन मुलीवर बलात्कार घटना वाढत आहेत,हे चिंतेची बाब आहे.पाकिस्तान महिलांना दुय्यम स्थान आहे, तेथे रक्षा मंत्री ख्वाजा अरिफ खान यांनी महिलेना कचरा म्हंटले, त्यावरुन पाक संसदेत गोंधळ झाला.जगातील अनेक राष्ट्रात महिलांना दुय्यम वागणूक दिली जाते.दुसरीकडे जगात भारतीय संस्कृतीचा अभिमान सांगितला जातो.पण या राष्ट्रात महिलावर रोज अत्याचार करण्याच्या घटना घडत आहेत.राष्ट्रीय गुन्हा नोंद विभागानुसार (एन. सी आर. बी.) देशात २०२०-२०२१ मध्ये ४ लाख २८ हजार २७८ महिलांच्या नोंद झाली.२०२१ मध्ये ३ लाख ७५ हजार ५ ८ महिला व ९०११११ मुली बेपत्ता आहेत. देशात रोज १०२७ महिला व २४६ मुली बेपत्ता होत असतात,रोज ८६ महिलांवर बलात्कार होत असतात. याची आपणाला लाजही वाटत नाही.अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणात फाशी झालेले सातशे प्रकरणे प्रलंबित आहेत.त्यात अजूनही आरोपींना शिक्षा झालेली नाही.भारतातून ब्रिटीश गेले असले तरी त्यांचे कायदे आजही चालूच आहेत.केंद्रीय गृहमंत्री शहांनी ऑगस्ट२३ मध्ये तीन नवीन कायदे विधेयक संसदेत मांडले. भारतीय दंड सहिता ( आय,पी.सी.१८६०) भारतीय पुरावा कायदा(आय.इ.ए.१८७२) फौजदारी प्रक्रिया सहिता (१९७३) यात बदल करण्यात येणार आहे.या कायद्यात मॉब लिचिंग व अल्पवयीन मुलीवर बलात्कार प्रकरणात फाशीची शिक्षेची तरतूद आहे. यावर राजकीय पक्षांनी विचार केला पाहिजे.किमान महिला अत्याचारा- बाबत कठोर कायदा व शिक्षेची तरतूद केल्याशिवाय या घटना थांबणार नाहीत.

# सामाजिक दायित्वतून केलेल्या कामांचा लाभ विद्यार्थ्यांना करून द्यावा

## डॉ. सुहासिनी शहा : लोकसहभागातून शाळेत विविध कामांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** सामाजिक दायित्व म्हणून कंपनीमार्फत काम करत असताना उदात्त हेतू ठेवलेला असतो. शाळेच्या कामामुळे कर विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व्हावा हा हेतू असतो. शिक्षक व पालकांनी या सर्व सुविधांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळवून द्यावा, असे आवाहन प्रिसीजन फाऊंडेशन च्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबिकानगर (बाळे) तालुका उत्तर सोलापूर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सोलापूर येथील प्रिसीजन फाऊंडेशन व बालाजी अमाईन्स यांच्या सीएसआर फंडातून व लोकसहभागातून शाळेत करण्यात आलेल्या विविध कामांच्या लोकार्पण सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रिसीजन फाऊंडेशन च्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा होत्या त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले, बालाजी अमाइन्स् चे तांत्रिक सल्लागार श्री मल्लिनाथ बिराजदार, गटशिक्षणाधिकारी श्री सिद्धेश्वर निम्बर्गी हे उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे प्रिसीजन फौंडेशन च्या वतीने सोलर सिस्टीम, इ - लर्निंग सुविधा देण्यात आली आहे. त्याचबरोबर मैदानावर पेव्हर ब्लॉक, फरशीकरण, किचन शेड व इतर कामे केली आहेत. त्याचप्रमाणे बैठक @ स्कूल, पासवर्ड, आविष्कार व नाट्य अभिनय प्रशिक्षण आदी प्रकल्प ही शाळेत सुरु करण्यात आली आहेत. त्याचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी चान्गला फायदा होत आहे. बालाजी अमाईन्स च्या माध्यमातून मुलींसाठी व मुलांसाठी उत्तम दर्जाचे स्वच्छतागृह बांधुन देण्यात आले आहे. शिक्षकांच्या सहभागातून रंगरंगोटी, छोटी बाग, वायफाय सुविधा व शाळेचे सुशोभीकरण करून घेण्यात आले आहे. लोकसहभागातून डॉ. अविनाश राउत यांच्या वतीने शाळेस सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या सर्व सुविधा विद्यार्थी केंद्रित आहेत. अशा सर्व सुविधा पुरविणारी तालुक्यातील पहिली शाळा आहे. या सर्व सुविधा परिसरातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

प्रारंभी सर्व मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. सुहासिनी शहा, प्रसाद मिरकले व मल्लिनाथ




बिराजदार यांच्या हस्ते लोकार्पण फलक व सर्व सुविधा यांचे उद्घाटन करण्यात आले. सर्व मान्यवरांचे शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आविष्कार प्रकल्पातून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार

शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले व डॉ सुहासिनी शहा मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षणाधिकारी श्री प्रसाद मिरकले यांनी आपल्या मनोगतात शाळेत झालेल्या सकारात्मक बदलाबद्दल कौतुक केले. सिएसआर च्या माध्यमातून

समाज आणि शिक्षक यांच्या सुसंवाद मधून शाळेचा विकास साधला आहे याचे सर्वांनी अनुकरण करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. शाळांना प्रीसीजन व बालाजी यांच्या वतीने करण्यात आलेल्या मदत मोलाची असल्याचे सांगत यापुढेही मदत करण्याचे आवाहन केले. मल्लिनाथ बिराजदार व सिद्धेश्वर निंबर्गी यांनी ही आपल्या मनोगतात शाळेने केलेल्या कामाचे कौतुक केले. इतरांनीही याबाबत पुढाकार घेऊन शाळेचा विकास करावा असे आवाहन केले. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ. लक्ष्मी कनकधर, उपाध्यक्ष सौ. कल्पना अडगळे, सर फौंडेशन महिला राज्य समन्वयक हेमा शिंदे व सौ प्रज्ञा अविनाश राऊत, केंद्रप्रमुख गुंडीबा हरगुडे हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती रंजना काटकर, वैशाली गोंदकर, तेजश्री ढगारे, रसिका बंदीछोडे शिक्षक शिवशंकर राठोड व शिवाजी वडते यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्याध्यापक सिद्धाराम माशाळे यांनी केले. या कार्यक्रमास विठ्ठलसिंह राजपूत, सीव्ही बिराजदार सर, तालुक्यातील केंद्रप्रमुख, विविध शाळेचे मुख्याध्यापक व पालकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.



# छत्रपती शिवाजीनगर येथे आ. शाह यांच्या हस्ते आनंदाचा शिधा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील आ.फारुख शाह यांच्या हस्ते शिवाजीनगर झोपडपट्टी येथे दुकान नंबर 32 येथे दीपावलीनिमित्त आनंदाचा शिधा वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात गरिबांना दीपावली निमित्त शिधा वाटप केले जाते.शहरातील संपूर्ण रेशन दुकानात गरिबांना शिधा वाटप व्हायला पाहिजे व सर्वांना दिवाळीच्या फराळासाठी शिधा उपलब्ध व्हावे म्हणून आज धुळे शहरातील आ.फारुख शाह यांनी शहरातील रेशन दुकानदारांची भेट घेऊन लाभार्थी गरिबांना शिधावाटप होत आहे किंवा नाही याची पाहणी केली व धुळ्यातील शिवाजीनगर झोपडपट्टी येथील दुकान नंबर 32 येथे आ.फारुख शाह यांच्या हस्ते शिधा वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला आ.फारुख शाह यांच्या प्रयत्नामुळे 22000 नागरिकांना रेशन कार्ड ऑनलाइन होऊन अन्नधान्य उपलब्ध होत आहे तसेच दिव्यांग परित्यक्ता विधवा व वृद्धांना शासनाच्या योजनेतून कसा लाभ देता येईल यासंदर्भात आ.फारुख शाह यांनी छगन भुजबळ यांची भेट घेऊन मान्य पुरवठा मंत्री यांच्याकडून शहरवासीयांसाठी ज्या रेशन कार्डधारकांना धान्य उपलब्ध होत नव्हते अशांसाठी आमदार कार्यालयातून नागरिकांचे अर्ज व फार्म उपलब्ध करून पुरवठा विभागाला सादर केले व आज शेकडो नागरिकांना त्याचा लाभ होत आहे. दिवाळीनिमित्त आ.फारुख शाह यांचे हस्ते शिधा वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळेस पुरवठा विभागातील पुरवठा निरीक्षणाधिकारी मायानंद भामरे व दुकानदार चौधरी हे उपस्थित होते.

# चितळी-पुतळी येथे 'गावाकडची दिवाळी' सिने अभिनेते संभाजी तांगडे उद्घाटक

आधुनिक केसरी न्यूज


**जालना :** गोदावरी प्रतिष्ठान मार्फत ग्रामीण भागात विविध समाजोपयोगी कामे केली जातात. यावर्षीपासून सांस्कृतिक दिवाळी गावपातळीवर साजरी करण्याच्या दृष्टीने ' गावाकडची दिवाळी ' या उपक्रमांतर्गत विविध साहित्यिक, सांगितिक, व्याख्यान आदी कार्यक्रम घेण्याचे निश्चित केले. यावर्षी 'जागर कवितेचा 'हा संजीवनी तडेगावकरांच्या कवितेवर आधारित उत्कर्ष थिएटर्स निर्मित शब्द स्वर अभिनयावर आधारित कार्यक्रमाचे अनोखे आयोजन केले आहे. संकल्पना सतीश लिंगडे यांची तर सहभागी कलावंत गायक विनोद जैतमहाल, गायिका अंजली काजळकर, सुमीत शर्मा, रेखा चव्हाण व निवेदन प्रा. रंगनाथ खेडेकर यांचे असेल.या अनोख्या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिद्ध नाट्य सिने अभिनेते संभाजी तांगडे करणार आहे तर ज्येष्ठ साहित्यिक प्रा. बसवराज कोरे यांची प्रमुख उपस्थिती असेल. दरवर्षी दिवाळी पाडव्याच्या दिवशी गावात या कार्यक्रमाचे आयोजन करून रसिकांना विविध सांस्कृतिक पर्वणीचा लाभ गोदावरी प्रतिष्ठान मार्फत उपलब्ध करून दिला जाईल. यावर्षी हा कार्यक्रम दिवाळी पाडवा दि.14 नोव्हेंबर 2024,मंगळवार रोजी संध्याकाळी 7.30 पुतळी येथे आयोजित केला आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच सौ. स्वप्ना वांजुळे व राजेंद्र वांजुळे यांनी दिली व उपस्थितीचे आवाहन केले.




# २४ व्या ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी साहित्यिक संजय वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** इगतपुरी तालुका साहित्य मंडळ आयोजित २४





व्या ग्रामीण साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक संजय वाघ यांची निवड करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष तथा जेष्ठ ग्रामीण साहित्यिक पुंजाजी मालुंजकर यांनी दिली आहे. संजय वाघ हे गेल्या ३३ वर्षापासून पत्रकारितेत सक्रिय असून त्यांच्या ' जोकर बनला किंग मेकर ' या किशोर कादंबरीला बाल साहित्य कादंबरीला साहित्य अकादमी दिल्लीचा पुरस्कार प्राप्त आहे. गाव मामाचं हरवलं हा काव्य संग्रह,तर बेडकाची फजिती, गोष्ट बोलक्या पोपटाची हे बाल कथा संग्रह, २६/११ चे अमर हुतात्मे, गंध माणसांचा, डॉ.श्रीपाल सबनीस प्रणित प्रतिभा संगम, उन सावल्या अशी ग्रंथ संपदा आहे. त्यांच्या साहित्याला अनेक क्षेत्रातील विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तर त्यांच्या विविधांगी साहित्याचा जळगाव, नांदेड, कोल्हापूर येथील विद्यापीठात अभ्यासक्रमासाठी समवेश करण्यात आला आहे. त्यांच्या निवडीमुळे साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी समाधान व्यक्त केले आहे. २४ वे ग्रामीण साहित्य संमेलन २७ नोव्हेंबर रोजी वाडीवऱ्हे येथे आयोजित करण्यात येणार असून संजय वाघ यांच्या सोबतच महाराष्ट्रातील अनेक नामवंत साहित्यिक या संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. साहित्य प्रेमींनी या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन साहित्य मंडळाचे अध्यक्ष पुंजाजी मालुंजकर, ग्रंथमित्र बाळासाहेब पलटणे,दत्तात्रय झनकर, ॲड. ज्ञानेश्वर गुळवे, रवींद्र पाटील, शरद मालुंजकर, हिरामण शिंदे यांनी केले आहे.



## लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



**हनिमून :** भारतीय परंपरेमध्ये लग्नबंधनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. जन्माला आलेला प्रत्येक पुरुष आणि स्त्री यांच्या शारीरिक गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या देशात लग्न या सामाजिक चौकटीचे पालन करतात. त्याला अनेक कारण आहेत. त्याच्या खोलात मी जाणार नाही. मात्र मी जसे नेहमी म्हणतो की, सेक्स या भावनेवर नेहमी स्थळ, काळ वेळ आणि संस्कृती यांचे बंधन असायलाच हवे. नाही तर समाजात स्वैराचार वाढेल आणि म्हणूनच आपल्या पूर्वजांनी ही एक समाजमान्य अशी चौकट आपल्याला आखून दिली आणि माझा विश्वास नव्हे तर माझी खात्री आहे की या चौकटीत राहून सेक्ससारख्या अतिशय गोड आणि सुखावह भावनेचा आनंद स्त्री-पुरुष दोघांनाही घेता येतो.




एका तरुण जोडप्याचे लग्न झाले की अनेक प्रथा, परंपरा पाळल्या जातात. त्याचप्रमाणे हनिमून ही एक प्रथा आहे. जी प्रथा गेल्या अनेक वर्षांपासून आपला समाज पाळत आलेला आहे. आता समाज, जाती, धर्म, गरीब, श्रीमंत याप्रमाणे हनिमून साजरा करण्याची पद्धत बदलते. मात्र तो साजरा होतो हे निश्चित.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

हनिमून हे नाव कसे पडले ?
हनी म्हणजे मध... मध म्हणजे गोडवा... आणि मून म्हणजे चंद्र... आता हे दोन शब्द एकत्र केले की होते हनिमून... त्याचा अर्थ असा आहे की, नवपरिणीत जोडप्यातला गोडवा, प्रेम, एकमेकांबद्दलचे मानसिक आणि शारीरिक आकर्षण मधातल्या गोडव्याप्रमाणे वाढावं आणि ते सुद्धा चंद्र जसा कलेकलेने वाढतो तसे ते प्रेम वाढावे, बहरावे याकरिता हे जोडपे आपल्या कुटुंबापासून, नातेवाईकांपासून दूर काही दिवस, काही काळ एकत्र राहते आणि सगळे विसरून एकरूप होते. अगदी मनाने आणि शरीराने. याला म्हणतात हनिमून... तुम्हाला सांगितले तर आश्चर्य वाटेल की ही प्रथा आल्याकडे सुमारे इ. स. १५०० ते १८०० या काळापासून सुरू आहे आणि त्याचे दाखले विविध पद्धतीने आपल्याला शास्त्रांमध्ये पाहायला मिळतात...

आपल्याकडे फार पूर्वीपासून ॲरेंज्ड मॅरेज करण्याची पद्धत आहे. ज्याला दोन कुटुंबांनी एकत्र येऊन ठरवलेला विवाह किंवा लग्न असे म्हणता येते. यात पूर्वी अनेक वेळा असे व्हायचे की मुलाला मुलगी किंवा मुलीला मुलगा सरळ लग्नमंडपातच दिसायचा. ती दोघे एकमेकांसाठी पूर्ण अनोळखी. मग लग्न झाल्यानंतर त्यांनी एकमेकांना जाणून घ्यावं, त्यांच्यातील अंतर कमी होऊन एकमेकांबद्दल प्रेम निर्माण व्हावं आणि मग त्यांच्या संसाराला सुरुवात व्हावी असा काहीसा उद्देश या हनिमूनच्या पाठीमागे पूर्वीच्या लोकांचा असावा, असे म्हणायला हरकत नाही. परत मी सांगेन की समाज, धर्म, जात, गरीब आणि श्रीमंत यानुसार यात बदल नक्कीच असतात. मात्र त्यापाठीमागची भावना सारखीच असते.

## सुरेखा खरात यांच्याकडून प्रामाणिकतेचे दर्शन; सापडलेली सोन्याची अंगठी केली परत

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जग हे खूप स्वार्थी झालेलं आहे.हल्ली प्रामाणिकपणा हरवत चाललेला आहे. प्रामाणिकपणा कुठे आहे तेव्हा? असे नेहमी ऐकायला मिळत असते. परंतु लोणंद मधील एका सफाई महिला कर्मचारी यांच्या प्रामाणिकतेचे दर्शन पाहायला मिळाल्याने लोणंद पंचक्रोशीतून त्या प्रामाणिकते बद्दल महिलेचे विशेष कौतुक होऊ लागलेले आहे. सफाई दरम्यान सापडलेली सोन्याची अंगठी परत केल्याने अशा या प्रामाणिकपणाला कौतुकाची थाप दिली जात आहे. सुरेखा नरेंद्र खरात असे या महिलेचे नांव असून त्या लोणंद नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत.७ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळच्या दरम्यान लोणंद ता.खंडाळा येथील सामाजिक कार्यकर्ते व हार्डवेअर व्यावसायिक संदीप (नाना) शेळके-पाटील यांची सोन्याची अंगठी भैरवनाथ गल्ली येथे बाजार करत असताना गहाळ झाली होती. त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी याबाबत आपल्या मित्र परिवारास तसेच गल्लीतील लोकांना माहिती दिली होती. यावेळी अनेकांनी ती सोन्याची अंगठी शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु यावेळी अंगठी सापडण्यास कोणतेही यश आले नाही. अंगठी शोधण्यास खूप प्रयत्न केल्यानंतर याबाबत बऱ्याच लोकांना ही गोष्ट माहीत झाली. तब्बल दोन दिवस होऊन गेले. अंगठी काही सापडली नसल्याने अंगठी मिळेल याची आशा पूर्णपणे संदीप (नाना) शेळके पाटील यांनी सोडुन दिली होती. अंगठी परत मिळू शकेल कदाचित संदीप शेळके यांचा सह त्यांच्या मित्र परिवाराला वाटून गेले सुद्धा असेल परंतु सुरेखा खरात यांच्यातील प्रामाणिकपणा मुळे ती अंगठी त्यांना परत मिळू शकली. दि.१० नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास नगरपंचायत स्वच्छता महिला कर्मचारी नेहमीप्रमाणे भैरवनाथ गल्ली येथे सफाई करण्यास आले असताना याच स्वच्छते दरम्यान सुरेखा नरेंद्र खरात (मावशी) यांना ही अंगठी दिसून आली. अंगठी सापडल्याचे सुरेखा खरात यांनी सर्व सहकारी कर्मचारी तसेच ज्यांची ही अंगठी गहाळ झालेली होती. ज्यांच्या अंगठी बद्दल चर्चा झाली होती ते सामाजिक कार्यकर्ते संदीप शेळके पाटील यांना या अंगठी बद्दल कल्पना दिली. ही अंगठी संदीप शेळके यांची असल्याने ती परत करण्यात आल्याने तसेच सुरेखा खरात यांच्या प्रमाणिक पणाचे दर्शन घडून आल्याने संदीप शेळके यांच्या सह मित्र परिवार आणि लोणंदकर नागरिकांनी कौतुक केले आहे.

**हा प्रामाणिक पणा खरंच खुप काही शिकवतो : संदीप (नाना) शेळके**

सुरेखा खरात यांच्या प्रामाणिकपणा बद्दल संदीप शेळके यांनी त्यांचे विशेष कौतुक करत त्यांच्या प्रामाणिकपणा बद्दल यथोचित असा सन्मान केला .या प्रामाणिकपणाचे कौतूक करताना संदीप (नाना) शेळके म्हणाले की, सुरेखा खरात यांचा हा प्रामाणिक पणा खरंच खुप काही शिकवतो . दिवाळीचा सण त्यात अशी अनमोल वस्तू त्यांना मिळाली .पण मनात कोणताही अविचार त्यांनी येऊ दिला नाही .खरंच असे प्रामाणिक निस्वार्थी कर्मचारी आपल्या नगरपंचायत मध्ये आहेत याचा सार्थ अभिमान वाटतो, असे त्यांनी म्हटले .




## जयाद्री कुशीत स्वरात न्हाली दिवाळी पहाट

### संगीत सम्राट कलाकारांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** जयाद्री कुशीतील जेजुरीच्या ऐतिहासिक शूरवीर सरदार मल्हारराव होळकर छत्री मंदिरं येथें जयाद्री मित्र परिवाराने आयोजित केलेल्या दिवाळी पहाट या कार्यक्रमात चैतन्यपूर्ण वातावरणात प्रख्यात संगीत सम्राट प्रथमेश मोरे आणि सहकलाकारानी जेजुरीकर रसिकाना मंत्रमुग्ध करणारी भक्तीगीत अभंग, लावणी भक्तीगीत सुफी आणि भरतनाट्य नृत्य अविष्कार सादर केला. सामाजिक सांस्कृतिक आध्यत्मिक क्षेत्रात कार्यरथ असलेल्या जयाद्री मित्र परिवार केली दहा वर्ष दिवाळी पहाट साजरी करत असून यंदा प्रख्यात संगीत सम्राट प्रथमेश मोरे गायक विकी कदम विनल देशमुख गायिका चित्रा आपटे, संगीतकार रोहन पवार, दत्ता काळोखे निवेदक महेश गायकवाड यांनी गीत गायन निवेदन ताला स्वराच्या संगीताने रसिकानाची मने रिजवली तर चिमूरड्या जानवी आगलावे हिने आपल्या नृत्य अविष्काराने लक्ष वेधून घेतले या कार्यक्रमासं सामाजिक कार्यकर्ते रवी जोशी, विठ्ठल सोनवणे डॉ कुटे, देवस्थान ट्रस्टी मंगेश घोणे, उज्वलाताई आगलावे, अर्चना क्षीरसागर पल्लवी नाजीरकर, वासंती पवार, गीतांजली टाक रुपाली कड सारिका झगडे वैशाली आगलावे, इत्यादी मान्यवर उपस्तित होते. आयोजन जयाद्री मित्र परिवाराचे गणेश टाक, अतुल आगलावे धनंजय केळकर, प्रशांत नाजीरकर,राजकुमार पवार, प्रसन्न शहा, महेश सोनवणे, सचिन झगडे, राहुल मंगणांनी,नंदू पोळ, विजयकुमार हरिश्चंद्रे आणि कु. गौतमी शर्वरी, सिद्धी, जुई,यांनी केले होते.



## प्रदीर्घ लष्करी सेवा करून परतणाऱ्या कॅप्टन गायकवाड यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भूमिपुत्र ऑननरी कॅप्टन सोमनाथ रामदास गायकवाड यांनी लागोपाठ ३०वर्ष देशाच्या बिविध सीमावर्ती भागात जाऊन प्राणांची बाजी लावून सीमा रक्षण केले,देश रक्षण केले, नुकतेच ते सेवा निवृत्त झाले,त्यांचा सेवा पुर्ती सोहळा व भव्य दिव्य नागरी सत्कार सोहळा गायकवाड वाडीच्या नागरिकांनी शनिवार(ता.११)रोजी केला. या प्रसंगी अध्यक्षस्थान नगराध्यक्षा शिल्पाताई परदेशी, होत्या. आ. रमेश पा. बोरनारे यांनीही थोर समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले पुतळा परिसरात मिरवणुकी दरम्यान कॅप्टन सोमनाथ गायकवाड यांचा सत्कार केला. देशाच्या सीमांचे रक्षण करतांनाचे अनेक प्रसंग सोमनाथ गायकवाड यांनी आपल्या मनोगतातुन व्यक्त केले. आ. बोरनारे व शिल्पाताई परदेशी, एकनाथ जाधव यांनी ही त्यांच्या देशसेवेचे कौतुक करत आता आरोग्यदायी जीवन जगून राहिलेले सामाजिक, कौटुंबिक व राष्ट्रीय कार्य करावे असा सल्ला दिला. आई भीमाबाई गायकवाड, वडील रामदास गायकवाड व पत्नी सौ. सविता सोमनाथ गायकवाड यांच्याकडे वेळ द्यावा असेही सुचविले. प्रास्ताविक अनिल शहाणे यांनी केले तर, आभार धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.यकवाड वाडी सरपंच दौलत गायकवाड, माजी सभापती सजनराव गायकवाड, रतीलाल गायकवाड, जगन गायकवाड यांनी या आयोजन केले होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# वैतरणा धरणात विषारी द्रव्य टाकून होतेय मासेमारी

## जलसंपदा विभागाचे दुर्लक्ष; धरणावर ना सुरक्षा, रक्षक ना, कुणी अधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** राज्याची राजधानी मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या तालुक्यातील वैतरणा धरणात मासेमारी व झिंगे मारण्यासाठी थेट वैतरणा धरणाच्या पाण्यात विषारी द्रव्य टाकुन मासेमारी केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वैतरणा धरणालगत असलेल्या शेवगेडांग, म्हसूर्ली या परीसरात झिंगा मारण्यासाठी थेट वैतरणा धरणात विषारी द्रव्य टाकुन मच्छीमारी केली जात असल्याची माहिती समोर आली आहे. या सर्व प्रकारामुळे वैतरणाचे पाणी मोठ्या प्रमाणात दुषित होत असून धरणातील इतर जलचर प्राणी देखील मृत्युमुखी पडत आहे. विशेष म्हणजे धरणाच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकच नसल्याने या गंभीर घटना येथील स्थानिक नागरिकांच्या समोर घडत आहे. वैतरणा धरणाचे पाणी या परिसरातील शेवगेडांग व म्हसुर्ली या गावांनाही पाणीपुरवठा होत असुन या दुषित पाण्यामुळे या परिसरातील नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात आले आहे. वैतरणा धरणातील पाणी पिण्यासाठी मुंबईला ही पाणीपुरवठा केला जातो. लाखो लोकांची तहान भागवीत असून या सर्व प्रकारामुळे मुंबईतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत शेवगेडांग, म्हसुर्ली येथील स्थानिक नागरिकांनी जलसंपदा विभागाकडे अनेक वेळा तक्रार करून ही जलसंपदा विभाग लक्ष देत नसल्याने मच्छीमारांचे चांगलेच फावत आहे. धरणाच्या पाण्यात विषारी द्रव्य टाकणाऱ्या संबधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे. संबधित व्यक्तींवर लवकर कारवाई न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.

इगतपुरी हा उत्तर महाराष्ट्रातील सर्वाधिक धरणाचा तालुका म्हणून प्रसिद्ध आहे. या तालुक्यात ब्रिटिश काळातील दारणा धरण,तसेच मुकणे, भाम, भावली,वाकी खापरी, कडवा आदी लहान मोठी धरणे आहेत. या धरणांमध्ये विषप्रयोग केल्याच्या घटना मागील काही वर्षत झालेला आहे. जायकवाडी ला पाणी सोडण्यास स्थगिती आल्यामुळे सर्वच धरणे तुडुंब भरलेले असून या सर्वच धरणात झिंगा, वाम, रऊ, कोंबडा, मुरा आदी असंख्य जातीच्या प्रजाती बहुसंख्येने बघायला मिळतात. तथापि काही व्यावसायिक नागरिक या धरणातील झिंगे व मासे जास्त हाती लागण्यासाठी जलाशयात विषारी द्रव टाकून रात्री मासेमारी करत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. मुकणे धरणात देखील झींगा बहुसंख्येने असून स्थानिक नागरिक मात्र त्याच्या चवी पासून अद्याप ही दूर आहेत.



# संजय गांधी निराधार श्रावणबाळ लाभार्थीची दिवाळी होणार गोड

## ८१६९ लाभार्थीसाठी २ कोटी २८ लाख रुपये अनुदान

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ,इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दपकाळ निवृत्ती विविध योजनांच्या ८१६९ निराधार लाभार्थींना २कोटी २८लाख २००रुपायाची निधी प्रशासनाकडून ऐन दिवाळीच्या तोंडावर निधी जमा झाल्याने लाभार्थ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या पुरस्कृत तथा संयुक्तपणे राबविण्यात येत असलेल्या निराधार योजनेअंतर्गत संजय निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना,इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दपकाळ निवृती वेतन योजनांच्या लाभार्थीसाठी ऐनदिवाळीच्या तोंडावर थकीत दोन महिन्याचे व वाढीव अनुदान प्रशासनाकडून बॅंकेत लाभार्थी खातेदारच्या खात्यांवर जमा करण्यात आले आहे. संजय निराधार ३८२८, श्रावणबाळ ३७९४, इंदिरा गांधी ५४७ एकुण ८१६९ लाभार्थी आहे.गत दोन महिन्यांचे थकीत अनुदान व वाढीव प्रतिलाभार्थी ५०० रुपये आदि २कोटी २८लाख२६हजार२००रुपये विविध बॅंकेत अनुदान जमा करण्यात आल्याने लाभार्थ्यांतून आनंद व्यक्त करण्यात येत असून त्यात समोर दिवाळी असल्याने लाभार्थीचा आनंद द्विगुणित झाला आहे.व यंदाची दिवाळी गोड होणार आहे.हे विशेष.मा.तहसीलदार स्वरुप कंकाळ खुलताबाद यांनी बॅंकेना इशारा दिला आहे की लाभार्थीना वेळीच व सन्मानाने विनातक्रार अनुदान वाटप करावे.लाभार्थीनी तक्रार केल्यास कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# वाळु डेपोची नागरिकांना प्रतीक्षा

## नागरिक, बांधकाम व्यावसायिक परेशान

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यात वाळु डेपोचा कोठेच पत्ता नसुण वाळु डेपोची नागरिकांतून प्रतिक्षा आहे तर सरकारची ती घोषणाच ठरत असुण वाळू साठी नागरिकांची भटकती सुरु आहे. चोरीची नव्हे तर सरकार कडून कमी दरात वाळु खरेदी करण्यासाठी सरकारने घोषणा केली खरी परंतु अद्याप तालुक्यात किंवा मोठ मोठ्या गावात वाळु डेपोचा कोठेही थांगपत्ता नाही. व नागरिकांना बांधकामांसाठी वाळु मिळत नाही.त्यामुळे अनेक बांधकामे ठप्प बंद पडून आहे.तर सर्वसामान्यांच्या बांधकामा साठी चोरटी वाळु खरेदी करणे आवक्या बाहेर असल्याने सर्वसामान्य जागीच चुरमुट्या देवून आहे.तर चोरट्या मार्गाने येणारी वाळु रात्री अपरात्रीच मिळते.चोरटी वाळु वाहतुक करनारे नाले खोले नद्या कोरोन कारुन माती मिश्रीत वाळु चढ्या भावाने विक्री करत असल्याने बांधकाम करणाऱ्यांना ती वाळु परवडत नाही.परंतु ना इलाजस्तव त्याचा वापर सर्वसामान्य करत आहे.त्यात महसूल व पोलीस प्रशासन चोरटी वाळु वाहतूक करणाऱ्यांवर टिपून बसल्याने त्यांचेही धाबे दणाणले आहे.गत आठवड्यातच व त्यापुर्वी महसूल प्रशासनाकडून दंडात्मक कार्यवाही झाल्याने चोरटी वाळु वाहतूकदार जागृत झाले आहे. महसुल व पोलिस प्रशासनाचे कोठून व कसी कार्यवाही होईल याचा अंदाज येत नसल्याने ते घाबरून आहे.गत आठवड्यात एक ट्रॅक्टर धारक संध्याकाळी आठ नऊ वाजेच्या दरम्यान चोरटी वाळु वाहतूक करत असताना त्याचा पाठलाग करुन ताब्यात घेतल्याचे निदर्शनास आले.महसुल व पोलिस प्रशासन वाळु ला घेवून सतर्क झाल्याने सद्या वाळु मिळे नसी झाली आहे व सरकारची वाळु डेपो घोषणा फक्त घोषणाच ठरत असल्याने वाळुला घेवून नागरिक तथा बांधकाम करते परेशान झाले आहेत.





# समाज व्यसनमुक्त करण्याची मोठी गरज

## नगरपरिषद मुख्याधिकारी पंकज गोसावी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** सध्या व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असुन दुसऱ्याला संकटातून बाहेर काढण्याचे कार्य या केंद्रामार्फत सुरू आहे ही अभिमानाची बाब आहे. व्यसनामुळे होणारे नुकसान, कुटुंबाची होणारी बरबादी याचे लावलेले चित्रमय तक्ते यामुळे समुपदेशन होईल. त्यामुळे मनशांती व्यसनमुक्ती केंद्र व्यसनाधीनतेचे प्रमाण कमी करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल यासाठी सर्वच घटकांनी या केंद्राच्या संचालकांना व संस्थेला मदत करावी असे प्रतिपादन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज गोसावी यांनी केले. कै. अण्णासो नारायण पाटील बहुउद्देशीय संस्था संचलित मनशांती व्यसनमुक्ती केंद्राच्या शुभारंभ प्रसंगी मुख्याधिकारी गोसावी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इगतपुरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज गोसावी होते. प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान राखोंडे, गटशिक्षणाधिकारी निलेश पाटील, आरपीआय तालुकाध्यक्ष सुनिल रोकडे, राज्य उपाध्यक्ष मुन्ना गुप्ता, उद्योग आघाडीचे जिल्हाध्यक्ष इंजि. विशाल देसले, रेस्क्यू आऊटरिच सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष मधुकर सूर्यवंशी, अध्यक्षा सुनंदा सूर्यवंशी, मराठा सेवा संघाचे नाशिक विभागाचे अध्यक्ष दीपक भदाणे, कै. अण्णासो नारायण पाटील बहुउद्देशीय संस्थेचे संचालक हुकुमचंद पाटील, जनसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण फलटणकर, आदर्श सोशल ग्रुप संस्थापक अजित पारख, आपले सरकार दवाखाना इगतपुरीचे प्रमुख डॉ.स्नेहल म्हस्के, पत्रकार संघाचे अध्यक्ष पोपट गवांदे, शैलेश पुरोहित, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रघुनाथ तोकडे, आमदार हिरामण खोसकर यांचे स्वीय सहाय्यक संदीप डावखर, आदिवासी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती तळपाडे, टिटोलीचे माजी सरपंच बाळू बोंडे, जेनेसिस फाऊंडेशनचे संचालक बिजू वर्गीस, ज्येष्ठ नागरिक संघाचे आर. जी. परदेशी, रामानंद बर्वे, युवा गुर्जर महासभा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. विजय पाटील, घाटनदेवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नवल सोनार, मारुती गोइकणे आदी मान्यवर उपस्थित होते. पोलीस खात्यात सेवा बजाविताना व्यसनामुळे मनुष्य गुन्हेगारीकडे वळत असतो याची अनेक उदाहरण डोळ्यासमोर आहेत.त्यामुळे व्यसनाचे समूळ उच्चाटन होण्यासाठी व्यसनमुक्ती केंद्रांची गरज असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक सोपान राखोंडे यांनी सांगितले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in